
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे,
विषय नाटक
दा. क्र. २३३४९



IRBK-0123349

# मिठू मिठू पोपट आणि सुतक

दिलीप पुरुषोत्तम चित्रे

वाचनालय नाटक
२३३४९
१७।९।८९

म. ग्रं. सं. मुं., वाचनालय नं.
पा. क्र. २३३४९ ता. दि. १७।९।८९
वि. नाटक

# मिठू मिठू पोपट

आणि

# सुतक

(दोन नाटके)

दिलीप पुरुषोत्तम चित्रे

6

IRBK-0123349

साकेत प्रकाशन

'सुतक' या नाटिकेचा पहिला प्रयोग रा. विजय बोन्द्रे यांनी लोकमान्य सेवा संघ, पार्ले या संस्थेच्या नाट्यशाखेच्या वतीने ८ ऑक्टोबर, १९७१ रोजी टिळक मंदिर, पार्ले येथे सादर केला.

दिग्दर्शक : विजय बोन्द्रे

कलाकार : सुधा जोशी
: अनुराधा भागवत
: माणिक चिटणीस
: सुनील शेण्डे
: बाळ चोळकर

प्रकाशयोजना : स्वाधीन डे

❀

'मिठू मिठू पोपट' या नाटकाचा पहिला प्रयोग रा. सत्यदेव दुबे यांनी दि नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स, मुंबई येथे 'थिएटर युनिट' तर्फे १९८२ मध्ये दिग्दर्शित केला होता. त्या प्रयोगाची श्रेयनामावली अशी :

दिग्दर्शक : सत्यदेव दुबे

सहदिग्दर्शन : नंदिता आरस
संगीत : चंद्रशेखर कामेरकर
आणि मिलिंद हाटे
नृत्यदिग्दर्शन : दीप्ति मेहता
पार्श्वगायन : फैयाझ, सरला भिडे,
शैलजा गुलवाडी, चंद्रशेखर कामेरकर
ध्वनिसंयोजन : सुनील शानबाग
प्रकाशयोजना : हरीश पटेल, प्रेमनाथ साव

कलावंत : विहंग नायक, सुनंदा कर्नाड, रेखा सबनीस, विद्या पटवर्धन, राजश्री सावंत, अनुराधा चौधरी, नीरा आडारकर, सुनीला प्रधान, दीप्ति मेहता, शिल्पा मेहता, आशा पिल्ले, वर्षा कोठारी, द्रौपदी रोहेरा, श्रीलेखा कुलकर्णी, हरीश पटेल आणि नंदिता आरस

या निर्मितीला दि नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांचे साहाय्य लाभले होते.

# मिठू मिठू पोपट

एक तमाशावजा खेळ

[ सामग्री :
एक पुरुष, त्याचा हिरवा पोशाख, नाकाला लाल रंग किंवा नाकावर बांधलेली पोपटासारखी चोच.
सहा बाया : त्यांतल्या मुख्य बाईसाठी नऊवारी साडी–चोळी, नाकात नथ, ओढण्यासाठी हॅवाना चिरूट, चिरुटांचा डबा, इतरजणी १५ ते ४५ वयाच्या, स्कर्ट, टॉप, जीन्स, शर्ट, सलवार-कमीझ, गरारा, शरारा, पाचवारी साड्या, मॅक्सी यांपैकी वयाला साजेसे पोशाख, पाच पिंजरे : पिंजरे अंगावर घेऊन चालता येतील, असे. स्टेजवर एक पार्टिशन, एक बालदी, एक लोटा, एक खराटा, जुनी वर्तमानपत्रं, एक मोडकी छत्री, जुनाट गमबूट, फाटके पायमोजे, गॉगल, हॅट, जुनी दुर्बीण-पितळी टेलिस्कोपवजा, मोठ्या आकाराची दुधी, बासरी किंवा सनई किंवा तत्सम वाद्य, झांजा, पितळी स्टोव्ह, बाहुली, फाटका फ्रॉक, इत्यादी. कोरसच्या मुली, स्त्री व पुरुष पार्श्वगायक, पुरुष क्र. २.

नटनट्यांना प्रत्यक्ष गाता येत नसेल, तर पदे अगोदरच ध्वनिमुद्रित करून घ्यावीत. यासाठी टेपरेकॉर्डरची व्यवस्था करावी लागेल. ]

## दृश्य पहिले

: नमन : ( राग यमन )
नमन करू या गणरायाला
पोटामध्ये पचवि सतत जो
नाटककारांचे अपराध
नमन करू या गणरायाला ॥ १ ॥

© दिलीप पुरुषोत्तम चित्रे,
१० श्रीवन,
१०९९, मॉडेल कॉलनी,
पुणे ४११ ०१६.

पहिली आवृत्ती १९८९

या दोन्ही नाटकांपैकी कोणत्याही नाटकाच्या प्रयोगासाठी
लेखकाची लेखी पूर्वपरवानगी आवश्यक आहे.

प्रकाशक :
बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
११५, महात्मा गांधीनगर,
स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५.

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ : आशय चित्रे

मूल्य : ३५ रुपये

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ग्रंथ.
ग्रा. क्र. २३३४९ नों. दि ९५।१९८
प्रा स्ता वि क...... क्र. ...
वि. ...

'सुतक' आणि 'मिठू मिठू पोपट' ही दोन्ही छोटेखानी नाटकं मी १९६८ च्या सुमारास लिहिली. आपल्या सांप्रतच्या तथाकथित आधुनिक शहरी सुशिक्षित समाजातल्या स्त्रीच्या स्थानाच्या निमित्तानं आपली एकूण कौटुंबिक आणि सामाजिक मूल्यव्यवस्थाच रंगभूमीवर आणण्याचा त्यात हेतू होता.

ही नाटकं बघणारे प्रेक्षक सर्वसाधारणपणे इतर मराठी नाटकं आणि हिंदी–मराठी सिनेमेच जास्त बघत असणार, हे गृहीत धरूनच त्यांची रचना केलेली आहे.

'मिठू मिठू पोपट' हे संगीत व नृत्यप्रधान नाटक वस्तुतः तमाशाच्या परंपरेतलं आहे. गण, गौळण आणि वग यांना त्यात दिलेलं शहरी मध्यमवर्गीय रूप मुळात परंपरागतच आहे. तसंच नांदी ते भरतवाक्य हा भरतप्रणीत अनुक्रम त्यात आहे.

माझे नाट्यदिग्दर्शक मित्र रा. सत्यदेव दुबे यांच्या मेहनतीमुळे हा तमाशावजा खेळ रंगभूमीवर आला. रा. दुबे यांनी मराठी प्रेक्षकांसाठी हे आणखी एक महत्त्वाचे काम केले.

'सुतक' ही नाटिका रा. विजय बोन्द्रे यांनी दिग्दर्शित करून सादर केली होती.

—दिलीप पुरुषोत्तम चित्रे

'सुतक' या नाटिकेचा पहिला प्रयोग रा. विजय बोन्द्रे यांनी लोकमान्य सेवा संघ, पार्ले या संस्थेच्या नाट्यशाखेच्या वतीने ८ ऑक्टोबर, १९७१ रोजी टिळक मंदिर, पार्ले येथे सादर केला.

दिग्दर्शक : विजय बोन्द्रे

कलाकार : सुधा जोशी
: अनुराधा भागवत
: माणिक चिटणीस
: सुनील शेण्डे
: बाळ चोळकर

प्रकाशयोजना : स्वाधीन डे

'मिठू मिठू पोपट' या नाटकाचा पहिला प्रयोग रा. सत्यदेव दुबे यांनी दि नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स, मुंबई येथे 'थिएटर युनिट' तर्फे १९८२ मध्ये दिग्दर्शित केला होता. त्या प्रयोगाची श्रेयनामावली अशी :

दिग्दर्शक : सत्यदेव दुबे

सहदिग्दर्शन : नंदिता आरस
संगीत : चंद्रशेखर कामेरकर
आणि मिलिंद हाटे
नृत्यदिग्दर्शन : दीप्ति मेहता
पार्श्वगायन : फैयाझ, सरला भिडे,
शैलजा गुलवाडी, चंद्रशेखर कामेरकर
ध्वनिसंयोजन : सुनील शानबाग
प्रकाशयोजना : हरीश पटेल, प्रेमनाथ साव

कलावंत : विहंग नायक, सुनंदा कर्नाड, रेखा सबनीस, विद्या पटवर्धन, राजश्री सावंत, अनुराधा चौधरी, नीरा आडारकर, सुनीला प्रधान, दीप्ति मेहता, शिल्पा मेहता, आशा पिल्ले, वर्षा कोठारी, द्रौपदी रोहेरा, श्रीलेखा कुलकर्णी, हरीश पटेल आणि नंदिता आरस

या निर्मितीला दि नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांचे साहाय्य लाभले होते.

# मिठू मिठू पोपट

□

## एक तमाशावजा खेळ

[ सामग्री :
एक पुरुष, त्याचा हिरवा पोशाख, नाकाला लाल रंग किंवा नाकावर बांधलेली पोपटासारखी चोच.
सहा बाया : त्यांतल्या मुख्य बाईसाठी नऊवारी साडी-चोळी, नाकात नथ, ओढण्यासाठी हॅवाना चिरूट, चिरुटांचा डबा, इतरजणी १५ ते ४५ वयाच्या, स्कर्ट, टॉप, जीन्स, शर्ट, सलवार-कमीझ, गरारा, शरारा, पाचवारी साड्या, मॅक्सी यांपैकी वयाला साजेसे पोशाख, पाच पिंजरे : पिंजरे अंगावर घेऊन चालता येतील, असे. स्टेजवर एक पार्टिशन, एक बालदी, एक लोटा, एक खराटा, जुनी वर्तमानपत्रं, एक मोडकी छत्री, जुनाट गमबूट, फाटके पायमोजे, गॉगल, हॅट, जुनी दुर्बीण-पितळी टेलिस्कोपवजा, मोठ्या आकाराची दुधी, बासरी किंवा सनई किंवा तत्सम वाद्य, झांजा, पितळी स्टोव्ह, बाहुली, फाटका फ्रॉक, इत्यादी.
कोरसच्या मुली, स्त्री व पुरुष पार्श्वगायक, पुरुष क्र. २.
नटनट्यांना प्रत्यक्ष गाता येत नसेल, तर पदे अगोदरच ध्वनिमुद्रित करून घ्यावीत. यासाठी टेपरेकॉर्डरची व्यवस्था करावी लागेल. ]

### दृश्य पहिले

: नमन : ( राग यमन )
नमन करू या गणरायाला
पोटामध्ये पचवि सतत जो
नाटककारांचे अपराध
नमन करू या गणरायाला ॥ १ ॥

पायांपाशी ज्याच्या उंदिर
किर्लोस्कर किंवा तेंडुलकर
नमन करू या गणरायाला ॥ २ ॥

स्थितप्रज्ञ तो, सोंड तयाची
निश्चल, जरी गोची सर्वांची
नमन करू या गणरायाला ॥ ३ ॥

[ स्टेजच्या मध्यावर पुरुष क्र. १ चे आसन. आसनावर एक रिकामा पिंजरा टांगलेला आहे.

स्टेजवर अंधार.

स्टेज प्रकाशात येते, तेव्हा पुरुष क्र. १ हिरवा गुरु–शर्ट घालून आणि लाल चोचीसारखे नाक लावून उडत–उडत आल्याचा अभिनय करत एकदा स्टेजच्या डावीकडून उजवीकडे आणि मग उजवीकडून डावीकडे जातो.

कोरसच्या दोन मुली दोन दिशांनी स्टेजवर येतात आणि एकमेकींकडे तोंड करून साधारण चार फूट अंतरावर उभ्या राहतात. ]

कोरस : ( उंच स्वरात )
मिठू मिठू पोपट
आहे मोठा चावट
खातो डाळ कच्ची
मलाच म्हणतो लुच्ची...

[ कोरसच्या दोन मुली एकमेकींकडे पाठ फिरवून उभ्या राहतात. ]

कोरस : मिठू मिठू पोपट
आहे मोठा चावट....

[ त्या पुन्हा स्टेजच्या दोन टोकांना जाऊन उभ्या राहतात. ]

कोरस : खातो डाळ कच्ची
मलाच म्हणतो लुच्ची...

[ त्या निघून जातात. ]

## दृश्य दुसरे

[ पोपट आसनावर. उरलेल्या बाया पिंजऱ्यांत. पडद्यात डमरूचा आवाज. पोपट आसनावरून उठून स्त्रीच्या पिंजऱ्याकडे चालत येतो. स्त्रीकडे टक लावून पाहत तो पिंजऱ्याला फेऱ्या घालतो. स्त्री त्याच्याकडे वळून वळून बघत राहते. ]

स्त्री : अशा फेऱ्या काय घालताय् ?
पोपट : ( थांबतो. तिच्याकडे तीक्ष्ण नजरेने बघतो. ) तुझं लग्न झालेलं असेलच ?
स्त्री : झालंय्. पण त्याचा तुमच्या फेऱ्यांशी काय संबंध ?
पोपट : तू वटपौर्णिमेचं व्रत करत असशीलच ?
स्त्री : करते. त्याचा तुमच्या फेऱ्यांशी काय संबंध ?
पोपट : तू फेरविचार केला असशीलच ?
स्त्री : रोज करते; पण त्याचा तुमच्या फेऱ्यांशी काय संबंध ?
पोपट : तू घड्याळाचे काटे फिरताना पाहिले असशीलच ?
स्त्री : दररोज बघते. पण त्याचा तुमच्या फेऱ्यांशी काय संबंध ?
पोपट : मी उलटे फेरे मारतोय्.
स्त्री : उलटे फेरे ?
पोपट : तू सप्तपदी केली असशीलच ?
स्त्री : हो....पण ?
पोपट : तू सात जन्म तोच–तोच मागितलेला नवरा, तू जन्मोजन्म हाच–हाच मागितलेला पिंजरा न्याहाळून बघतोय् मी. काय ग, हा किती टिकाऊ आहे ?
स्त्री : हा पिंजरा ?
पोपट : हो. हा पिंजराच. किती भक्कम आहे ?
स्त्री : हा पिंजरा नाही, हा माझा सुखी संसार आहे.
पोपट : ( टाळ्या वाजवून ) वाहवा ! ऐका, हो, ऐका ! ही म्हणते, हा सुखी पिंजरा आहे ! ( टाळ्या वाजवून ) ऐका, हो, ऐका ! ही सुखी बाई आहे ! सर्वांना दिसावी, म्हणून हिला अशी पिंजऱ्यात ठेवलीय् ! ( स्त्रीकडे बघून ) तुझ्या सुखी संसाराचं रहस्य शोधतोय् मी. ते काय बरं ?
स्त्री : त्यात कसलं आलंय् रहस्य ?
पोपट : रहस्य याचंच, की तू पिंजऱ्यात सुखानं सात जन्म राहायला मिळावं, म्हणून चक्क व्रतवैकल्यं करतेस ! ( टाळ्या वाजवतो. ) वा, वा, वा ! थोरच बाई दिसते ही ! हिला कसलं सुख मिळतं, माहीताय् ? घड्याळाचा गजर होतो,

त्याचं सुख. रोज उजाडतं, त्याचं सुख. नवऱ्याला ही चहा करून देते, त्याचं सुख. ही रोज स्वयंपाक करते, त्याचं सुख. तो रोज कामावर जातो, त्याचं सुख. तो रोज परत येतो, त्याचं सुख. घरात एक बिछाना आहे, त्याचं सुख! (स्त्रीला उद्देशून) काय, खरंय् की नाही?

स्त्री : माझ्या सुखदुःखांशी तुमचा काय संबंध?

पोपट : आम जनतेच्या आणि समग्र मानवतेच्या सुखदुःखांशी माझा एकट्याचाच काय तो संबंध आहे, मी कोण आहे ठाऊकाय्?

स्त्री : कुठं तरी पाहिल्यासारखं वाटतं तुम्हांला...कुठं बरं!

पोपट : तरी बरं, रोज मी तुझ्या स्वप्नात येतो. निरनिराळ्या रूपांत.

स्त्री : काय, हो, तुम्हांला दुसरा धंदा नाही, वाटतं?

पोपट : मी स्त्रियांचा अभ्यासक आहे. लहानपणापासून हाच माझा छंद. हाच माझा धंदा.

स्त्री : म्हणजे तुम्ही मवाली आहात, की ब्रह्मचारी?

पोपट : मी महाकवी आहे.

स्त्री : महाकवी!

पोपट : शिवाय मी अमर आहे.

स्त्री : अमर!

पोपट : शिवाय मी भ्रमर आहे.

[पडद्यात डोंबाऱ्याच्या खेळाच्या वेळी वाजतो, तसला डमरू वाजू लागतो. पोपट पिंजऱ्याभोवती फेऱ्या घालू लागतो. डमरू थांबताच पोपट थांबतो, स्त्रीकडे रोखून बघतो.]

स्त्री : रोखून काय बघताय्?

पोपट : तुझं लावण्य आणि त्याच्या भोवतालचे हे भक्कम गज.

स्त्री : (अस्वस्थ होऊन) मला तुमची भीती वाटतेय्.

पोपट : वाटणारच! वाटणारच! सुरुवातीला फक्त भीतीच वाटते. जन्मल्याबरोबर पहिल्यांदा भीतीच वाटते. आईची भीती. बापाची भीती. भावाची भीती. बहिणीची भीती. नात्याची भीती. गोत्याची भीती. पेटीची भीती. पोत्याची भीती. कडीची भीती, कुलुपाची भीती. अंगाची भीती, रंगाची भीती. (टाळ्या वाजवून) सात जन्मांची भीती. माणसांची भीती. भाषेची भीती. शांततेची भीती. (टाळ्या वाजवून) बोल, तुला संसाराची भीती वाटते, की नाही? तुला गोड्या तेलाची भीती वाटते, की नाही? तुला हळदीची भीती नाही वाटत?

तुला डाळ-तांदळाची भीती वाटत नाही ? विजेच्या दिव्यांची तुला भीती वाटत नाही काय ? सिनेमाच्या तिकिटांची तुला भीती वाटते, की नाही ? रेल्वेचा पास एकांतात पाहून तू थराथरा कापत नाहीस, काय ? ( टाळ्या वाजवून, दरडावणीच्या स्वरात ) खरं बोल !

स्त्री : ( मटकन् खाली बसून पोपटाकडे दीनवाण्या नजरेनं बघत ) तुम्हांला हे सगळं कोणी सांगितलं ? मी कोणाजवळच बोलले नाही अजून !

पोपट : हाच माझा छंद. हाच माझा धंदा. खरं सांग, ह्या पिंजऱ्याची तुला भीती वाटत नाही ?

स्त्री : ( उठून उभी राहत ) कोण आहात, हो, तुम्ही ?

पोपट : मी द्रष्टा आहे. मी महाकवी आहे. मी स्त्रियांचा उद्धारकर्ता आहे. मी संसाराच्या पिंजऱ्याची दारं उघडणार आहे !

स्त्री : तुम्ही पोटापाण्यासाठी काय करता ?

पोपट : कोणाच्या पोटापाण्यासाठी ?

स्त्री : स्वतःच्या.

पोपट : मूर्ख ! मी स्वतंत्र आहे. मला पोटापाण्यासाठी काहीच करावं लागत नाही.

स्त्री : तुमचा व्यवसाय काय ?

पोपट : मी महाकवी आहे.

स्त्री : तुमचं आडनाव काय ?

पोपट : वाल्मीकीचं आडनाव काय ? व्यासाचं आडनाव काय ? कालिदासाचं आडनाव काय ? आडनावं असतात आडगावकरांना ! महाकवी भर रस्त्यात असतो !

[ पडद्यात डमरूचा आवाज. ]

पोपट : मी आसाममधल्या आत्यासाठी काव्य करतो. मी मध्यप्रदेशातल्या मावशीसाठी काव्य करतो. मी फ्रान्समध्ये ट्रान्समध्ये जातो. मी हंगेरीतला रंगारी आहे. मी मध्ययुगातला मर्द आहे. मी ठुमरीमधला दर्द आहे. (पडद्यात पुन्हा डमरूचा आवाज. तो थांबताच ) मी सर्व प्रश्नांच्या मधोमध बासरी वाजवणारा कृष्ण आहे. मी गरोदर बायांच्या कानांवर येणारा काळाभोर पडघम आहे. मी गंगेत नहाणारा नंगा आहे. मी खेळखंडोबा आहे. मी पोपटांमधला विठू आहे. मी पाण्यातला पक्षी आहे. मी माशाचं प्रतिबिंब आहे. ( पुन्हा डमरू वाजून थांबतो. )

स्त्री : देवा ! मला सोडव ! देवा, मला सोडव !

पोपट : ( तिला पिंजऱ्याबाहेर काढतो. भारावल्याप्रमाणे ती त्याच्या मागे जाताना)

प्रसंगाचं गांभीर्य कळलंच असेल! (प्रेक्षकांकडे वळून) आला. साक्षात्काराचा क्षण आला!

[दोघे पार्टिशनमध्ये जाताच डमरूचा आवाज सुरू. दिव्यांची उघडझाप. डमरू थांबताच स्त्री सुखाने किंचाळते. हसते. पुन्हा डमरू. स्त्री कळवळते, ढसाढसा रडते. पुन्हा डमरू.
डमरू थांबताच कण्हत लंगडत पोपट पार्टिशनबाहेर येतो. त्याच्या एका हातात पितळी स्टोव्ह आणि दुसऱ्या हातात गमबूट आहे.
स्त्री त्याच्या पाठोपाठ येऊन पुन्हा निश्चलपणे पिंजऱ्यात उभी.
पोपट गमबुटात डोकावून बघतो. मग गमबूट खाली ठेवून त्याला भक्तिभावाने नमस्कार करतो आणि स्टोव्ह खाली ठेवून, उकिडवा बसून त्याला पंप करू लागतो.

पोपट : (पंप करत) हा परमेश्वराचा पंप आहे. (थांबून, पंप करणंसुद्धा थांबवून) यात भक्तीचं घासलेट घालावं लागतं. (पंप करतो. थांबतो. स्टोव्ह आणि गमबूट उंच उचलून सर्वांना दाखवतो.) या वस्तूंचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे.

[गमबूट आणि स्टोव्ह घेऊन लंगडत लंगडत आपल्या आसनावर जाऊन बसतो. अंधार.]

कोरस : मिठू मिठू पोपट
आहे मोठा चावट
खातो डाळ कच्ची
मलाच म्हणतो लुच्ची

मिठू मिठू पोपट
आहे मोठा चावट
खातो कैरी कच्ची
मलाच म्हणतो लुच्ची

मिठू मिठू पोपट
आहे मोठा चावट
खातो हिरवी मिरची
मलाच म्हणतो लुच्ची....

## दृश्य तिसरे

[ पोपट आपल्या आसनावरून उठून उभा राहतो. आळोखेपिळोखे देऊन तो रंगभूमीवर फिरू लागतो.
नव्या स्त्रीच्या पिंजऱ्यापाशी तो येताच पडद्यात डमरू वाजू लागतो. डमरू थांबताच ]

पोपट : सुरुंगासारखी स्फोटक स्त्री तुरुंगासारख्या बंदिस्त अवकाशात काय करू शकणार ? ( डमरू वाजून थांबताच ) कोणाची मुलगी, तर कोणाची आई. कोणाची नवरी, तर कोणाची बाई. कोणाला दूध देणारी गाई, तर कोणाच्या टांग्याला जुंपलेली घोडी. कुठं टायपिंग करतेय् , तर कुठं दळण दळतेय्. तव्यावर भाकरी, ऑफिसात नोकरी. कुठं ठुमरी गाणार, कुठं कॅब्रेत नाचणार. कुठं इस्पितळातली नर्स, तर ( डमरू जोरात वाजून थांबतो ) कुठं देवदासी. कधी कुंटीण, तर कधी सुईण...( स्त्रीकडे वाकून-वाकून बघू लागतो. )

स्त्री : असं वाकून-वाकून काय बघताय् ?

पोपट : उर्वशी, मेनका, अहल्या ( डमरू थांबून वाजतो. वाजून थांबतो. ) पहिली एलिझाबेथ, कॅथरीन द ग्रेट, मारिआंत्वानेत. ( डमरू वाजून थांबतो ) चांदबीबी, रझिया, अहल्याबाई होळकर, लक्ष्मबाई झाशीवाली, आनंदी राघोबा, ( डमरू वाजून थांबतो. ) ग्रेटा गार्बो, मार्लिन डिट्रिश, मार्लिन मॉन्रो ( डमरू परत वाजू लागतो ) जीन हार्लो !

स्त्री : ( डमरू थांबताच ) अहो, तुम्हांला काही लाज ? आयाबहिणी नाहीत काय तुम्हांला ?

पोपट : आयाबहिणी, शिवाय वहिनी ! ( डमरू परत वाजून थांबतो. ) आज्या-पणज्या अन् फळभाज्या... ( डमरू वाजून थांबतो. ) मामेबहिणी आणि दुर्बिणी ... ( डमरू वाजून थांबतो ) काक्या, माम्या, आत्या, मावश्या ! नवसासायासाच्या मिश्या ! ( डमरू वाजून थांबतो. )

स्त्री : असं काय पाहताय् ? मी काय बाजारातला माल वाटले तुम्हांला ?

पोपट : पहिली गोष्ट, म्हणजे तुरुंगातला प्राणी-मग तो सिंह असो वा ससा-प्रेक्षकांबाबत तक्रार करू शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, सर्कशीतला प्राणी, मग ती झुल्यावरली झगमगीत चड्डीतली कसरत करणारी असो किंवा स्टुलावर निमूट बसणारी वाघीण, रिंग-मास्टरचं ऐकून घेतेच. ( डमरू वाजून थांबतो. )

स्त्री : माझ्याकडे असं पाहू नका !

पोपट : मी तुझ्या गजांकडे बघतोय्. गजांची काय लाज बाळगायची !

स्त्री : ( चमकून ) गज ? ( अवतीभोवती बघते. स्वतःचंच अंग चाचपते ) कुठले गज ? कसले गज ?

पोपट : हे गज कौमार्याचे आहेत. अथवा हे गज संसाराचे आहेत. भर बिछान्यातलं दळण. आंधळं दळतं, कुत्रं पीठ खातं. जन्मभरांच्या जिभा बाहेर येतायृत. पाल्हाळाची लाळ गळतेय् !

स्त्री : हे गज सौख्याचे आहेत. हे गज संभ्रमांचे आहेत. हे गज मुलाबाळांचे आहेत. हे गज कुटुंबाचे आहेत. हे गज समाजाचे आहेत. हे गज...

पोपट : माझा मी आहे, पण तुझी तू नाहीस. मग तू जोशी अस, की कुळकर्णी अस. मग तू जाधव अस, की भोसला अस. मग क्लास वन् अस, की क्लास थ्री अस. मग तू फाईव्ह स्टार अस, की ..

स्त्री : हा पिंजरा व्रतांचा आहे. हा पिंजरा क्षेत्रांचा आहे. हा पिंजरा विधींचा आहे.

पोपट : तुला लवंग हवी का, लवंग ? तुला पतंग हवा, की पलंग ? ( डमरू वाजून थांबतो. )

स्त्री : हा तुरुंग मांगल्याचा आहे. हा तुरुंग नैतिकतेचा आहे. हा तुरुंग सौजन्याचा आहे.

पोपट : लवकरात लवकर औचित्यभंग करायला शीक.

[ पडद्यात जलद डमरू वाजून थांबतो. ]

स्त्री : औचित्यभंग केल्यानं काय होतं ?

पोपट : औचित्यभंग केल्यानं काय होत नाही ? औचित्यभंग होताच देह पुलकित होतो. औचित्यभंग होताच रस स्रवू लागतात. औचित्यभंग झाल्याशिवाय डोळे उघडत नाहीत. औचित्यभंगामुळं देवत्व येतं. औचित्यभंगात ब्रह्मांड दिसतं. ( पडद्याकडे बघून ओरडतो ) पद चालू करा !

( पद )

चल, ग, सखे, औचित्याचा करू भंग ।
वाजतो जिवाआड मृदंग ॥
आनंदात मी, आनंदात तू ।
परस्परांमधी दंग ।
चल, ग, सखे...ध्रु. ॥

[ पद सुरू असताना पोपट हातवारे करत असतो. ]

स्त्री : तुम्ही मला कसली लालूच दाखवताय् ?

पोपट : लालूच ? हा मंत्र ऐक :

लाल लाल लुच लुच लुच लाल
लालुच लालुच लालाला लाल लाल
लुचु लुचु लुचु लालुच लुचु लाल
लालुच लुचु लाल लालुच लुचु लाल

[ पडद्यात जोराजोराने डमरू वाजून थांबतो. ]

स्त्री : हे काय, हो, करताय् तुम्ही ? पाहा, माझे गाल कसे लाह्लाल झाले ! पाहा, माझी छाती कशी हुरळून गेली. पाहा, माझ्या पाठीवर हिरवळ उगवली.

[ पडद्यात जोरजोरात डमरू वाजून थांबतो. ]

पोपट : थांब. कुलूप उघडायची वेळ आली. स्वातंत्र्य उपभोगायची वेळ आली. पाहा, वाऱ्यात कसा लसणाचा वास दरवळतो आहे. ऐक, दूरवर कसे ढग गडगडत आहेत.

[ पडद्यात अनेक पिपाण्या वाजतात. ]

स्त्री : कुठं गेली ती काळीभोर कढई, ते उकळणारं तेल ? इंद्रियांच्या पुऱ्या कशा छान फुगून येतील, नाही ? कुठं गेला तो खरपूस प्रसंग ?

[ पडद्यात सनई–चौघडा वाजून थांबतो. ]

पोपट : हां. ये. अश्शी बाहेर ये. कशी वाटली हवा ? ( ती बाहेर येते. ) आता चल माझ्या पार्टिशनात सुखदुःखाच्या गोष्टी बोलू.

[ दोघे पार्टिशनच्या दिशेने वळतात. ]

स्त्री : रिझवाल, तर रिझवा. शिजवाल, तर शिजवा. विझवाल, तर विझवा.

पोपट : अग कवळे, तुला कच्ची खाऊ, का भाजून ?

[ दोघे पार्टिशनजवळ येतात. ]

स्त्री : बेदम तर बेदम. झोडपून तर झोडपून.

[ दोघेही पार्टिशनआड जातात. ]

पोपट : ओय् ! ओय् ! मेलो, मेलो !
ठो ठो ठो ठार ठार.
कोसळलो, ग, आई कोसळलो,
मला सांभाळ !

[ पडद्यात वादळासारखा गडगडाट, वाऱ्याचा आवाज. ]

स्त्री : लुचु लुचु लुचु लालूच लाल लाल
लुच्ची लालुच लुचु लुचु लुचु लालच लाल.

[ हसत सुटते. शांतता. गिरणीचा भोंगा. सायरन. प्रचंड गलबला.
पोपट एकटाच लंगडत एक फलक घेऊन येतो. ]

पोपट : इन्किलाब झिंदाबाद !

[ पोपट आसनावर जाऊन बसतो. स्त्री पुन्हा पिंजऱ्यात निश्चल. अंधार. ]

**: दृश्य चौथे :**

( गाणं )

आंबा पिकतो
रस गळतो
कोकणचा राजा....

[ पोपट आपल्या आसनावरून उतरून मुलीकडे चालत येतो, मुलगी त्याच्याकडे आश्चर्याने बघत राहते. मुलीजवळ येऊन पोपट वाकून शीळ घालतो. तिला हसू येतं. पोपट तिच्याभोवती तीनदा फेऱ्या घालतो. ]

पोपट : काय, ग, कितवीत आहेस तू ?

मुलगी : आठवीतून नववीत गेले.

पोपट : वा ! वा ! छान. म्हणजे बीजगणित शिकणार तू आता ! बरं, मग पुढं काय करणार ?

मुलगी : पुढं ? पुढं दहावीत जाणार !

पोपट : आणि दहावीनंतर ?

मुलगी : मग अकरावी ! मग बारावी !

पोपट : आणि बारावीनंतर ?

मुलगी : मार्क चांगले पडले, तर डॉक्टर होणार ! मेडिकलला जाणार !

पोपट : काय ? मेडिकलला जाणार ? बेडूक कापावा लागेल, ठाऊकै ?

मुलगी : त्यात काय झालं ?

पोपट : पुढं माणूस कापावा लागणार ! किंवा एखादवेळ बाईसुद्धा !

मुलगी : जिवंत माणूस ?

पोपट : प्रथम मेलेला माणूस. मग पुष्कळ प्रॅक्टिस झाल्यावर मेलेल्याऐवजी जिवंत माणूस ! आहे तयारी ?

मुलगी : ( डळमळते )

पोपट : आ ऽ कर !

मुलगी : अं ?

पोपट : आ ऽ ऽ कर !

मुलगी : आ ऽ ऽ !

पोपट : जीभ बाहेर काढून आ ऽ ऽ कर !

मुलगी : ( बिचकत ) तुम्ही डॉ....डॉक्टर आहात ?

पोपट : हो. मी मुलींचा आणि तरुण स्त्रियांचा स्पेशॅलिस्ट डॉक्टर आहे. बरं तर, जीभ बाहेर काढून आ ऽ ऽ कर.

मुलगी : ( जीभ बाहेर काढून ) आ ऽ ऽ ऽ

पोपट : तुला डॉक्टर होता येणार नाही.

मुलगी : ( खट्टू होऊन ) का ?

पोपट : कारण तू निष्पाप दिसतेस. तुला गाता येतं का ?

मुलगी : न...नाही !

पोपट : तुला कविता म्हणता येते का ?

मुलगी : माझं पाठांतर चांगलं नाही.

पोपट : तुला सिनेमे आवडतात का ?

मुलगी : हो.

पोपट : तुझा आवडता नट कोण ?

मुलगी : अमिताभ बच्चन.
पोपट : तुला डॉक्टर होता येणं अशक्यच आहे.
मुलगी : का ?
पोपट : त्याचं असं आहे...डॉक्टर व्हायचं, म्हणजे शरीराची माहिती हवी. सिनेमे बघून ती मिळत नाही.
मुलगी : मग कशी मिळते ?
पोपट : त्यासाठी मोठं व्हावं लागतं.
मुलगी : किती मोठं ?
पोपट : वयात यावं लागतं.
मुलगी : वयात तर सगळे आपोआपच येतात.
पोपट : खोटं आहे ते ! कोण म्हणतो, सर्वजण आपोआप वयात येतात ? अमिताभ बच्चन ?
मुलगी : आमच्या सायन्सच्या पुस्तकात लिहिलंय् , की....
पोपट : ( दरडावून ) नाव काढू नको सायन्सच्या पुस्तकाचं ! वयात येणं इतकं सोपं नसतं ! वयात येण्यासाठी कष्ट करावे लागतात.
मुलगी : पण सायन्सच्या पुस्तकात...
पोपट : सायन्सऐवजी कवितेची पुस्तकं वाच, म्हणजे कळेल !
मुलगी : कविता वाचल्या, की वयात यायला होतं ?
पोपट : हो. कविता वाचल्या, की मुलांना मिसरूड फुटते आणि मुलींना...त्यांची वाढ होते. त्या मोठ्या बायांचे कपडे घालू लागतात. कविता वाचल्या, की अंगात एक गमतीची थरथर व्हायला लागते ! कानशिलं गरम होतात ! श्वास जोरजोरात होतो ! आपल्याला कोणीतरी खूप खूप गुदगुल्या कराव्याशा वाटतात...बरं, आता तू त्या पार्टिशनआड जा, पाहू !
मुलगी : कशासाठी ?
पोपट : वयात येण्यासाठी !

[ मुलगी व पोपट पार्टिशनआड जातात. पार्टिशनआडून कोरसमध्ये गाणं : ]

आंबा पिकतो
रस गळतो
कोकणचा राजा
झिम्मा खेळतो

झिम् पोरी झिम्
कपाळीचं भिंग
भिंग गेलं फुटून
पोरी आल्या उठून...

[ अचानक मुलीची आर्त किंकाळी....मग शांतता....मग मुलीचा गुदगुल्या झाल्यासारखा बेदम हसण्याचा आवाज...मग कण्हण्याचा, मग रडण्याचा, मग हुंदके दिल्याचा आवाज. शांतता.
पार्टिशनमधून पोपट एकटाच एक तुटलेली बाहुली आणि एक फाटका फ्रॉक घेऊन बाहेर येतो. आसनाकडे चालत जातो. ]

**पद ( चंद्रकंस )**

संपले पुरुष हे
खाटेवर पडलेले
ओढत सिगरेटी ॥ ध्रु. ॥

त्यांच्याने जमेना
काहीही का ऽ काम
कामशास्त्र लिहिती जे
संपले ॥ ध्रु. ॥

मिशीवरती देती ताव
सतत करती कावकाव
गावगाव भटकुनी
स्त्रियांना छळती जे
संपले ॥ ध्रु. ॥

[ अं धा र ]

## दृश्य पाचवे

[ त्याच वेळी पुरुष क्र. २ प्रवेश करतो. याने पायजमा आणि गंजीफ्रॉक घातलेला आहे व डोळ्यांना गॉगल लावलेला आहे.

पुरुष क्र. २ येईपर्यंत पुरुष क्र. १ आपल्या आसनावर जाऊन बसला आहे; त्याच्यावर स्पॉट्-लाईट् स्त्रिया अंधारात. एक स्पॉट्-लाईट पुरुष क्र. २ वर.

तो रमतगमत पुरुष क्र. १ च्या आसनापर्यंत येतो. ]

पुरुष २ : त्याचं काय आहे...

पुरुष १ : त्याचं काय आहे !

पुरुष २ : मला मराठी नीट बोलता येत नाही.

पुरुष १ : सध्या कोणालाच मराठी नीट बोलता येत नाही.

पुरुष २ : ( पुरुष १ ला उद्देशून ) मुख्य म्हणजे... ( थांबतो, हातवारे करतो. थांबतो. ) नाही, म्हणजे त्याचं असं आहे...

पुरुष १ : अजून तू चांदण्या रात्री गॉगल लावून...

पुरुष २ : चांदणी रात्र ? ( थांबतो. हातवारे करतो. थांबतो ) मुख्य म्हणजे आज अमावास्या आहे.

पुरुष १ : याचा अर्थ असा, की तू अमावास्येच्या रात्रीसुद्धा गॉगल लावतोस.

पुरुष २ : ( हातवारे करतो. थांबतो.) माझे पणजोबा महामहोपाध्याय होते. (थांबतो. हातवारे करतो. थांबतो ) पण, यार, ते जाऊ दे. मुख्य म्हणजे बाया तुझ्यावर का भाळतात ?

पुरुष १ : का भाळतात ? मी कवी आहे, कवी.

पुरुष २ : मग काय झालं ? याचा बायांशी काय संबंध ?

पुरुष १ : काय संबंध ? बायांना कविता आवडतात.

पुरुष २ : मलाही एक–दोन कविता येतात. म्हणून दाखवू ? ( हातवारे करतो ) सोने लुटुनी सायंकाळी मोरू परतुनि आला... आला.... आला...

पुरुष १ : तू मूर्ख आहेस !

पुरुष २ : मूर्ख आहे ? तर आहे मूर्ख. पण मूर्ख झालो, तरी मलाही स्वतःची अशी एखाद–दुसरी बाई... ( थांबतो. हातवारे करतो. थांबतो.) नाही... म्हणजे लग्न करायला लागलं, तरी चालेल. ( थांबतो. चुळबुळतो.) पण मुख्य म्हणजे बाया तुझ्यावर का भाळतात ?

पुरुष १ : माझ्यात एक भारून टाकणारी शक्ती आहे.

पुरुष २ : शक्ती ? तुझ्यात ? म्हणजे ?

पुरुष १ : शक्ती म्हणजे प्रभाव, प्रभाव, प्रभाव !

पुरुष २ : मा...मा....माझ्यात एक अभाव आहे.

पुरुष १ : तेच ते. तुझ्यात ज्याचा अभाव आहे, तेच माझ्यात आहे. त्याच्यावरच बाया भाळतात.

पुरुष २ : ( चुळबुळतो ) ते काय असतं ? कसं असतं ?

पुरुष १ : तू बाई असतास, तर ते तुला कधीच कळलं असतं.

पुरुष २ : माझी काकी एक बाई आहे. तिला ते कळेल का ?
पुरुष १ : काकी ! काय वय तिचं ?
पुरुष २ : कालच तिला बासष्ठावं सरून त्रेसष्ठावं लागलं. ( चुळबुळत ) फार अनुभवी बाई आहे.
पुरुष १ : त्रेसष्ठावं ? मग तिला ते कळणार नाही.
पुरुष २ : का ?
पुरुष १ : स्त्रीची जननशक्ती संपली, की तिला कळेनासं होतं. किंबहुना जननशक्ती हीच स्त्रीची एकमेव शक्ती होय. कळलं काय ?
पुरुष २ : ( हुंदके देऊन रडू लागतो. )
पुरुष १ : अरे, अरे ! तुला रडायला काय झालं ?
पुरुष २ : माझ्या काकीची जननशक्ती ! ( ढसाढसा रडू लागतो. ) का रडू नये ?
पुरुष १ : रडू नकोस. तुझ्या काकीला मुलीबाळी असतीलच. त्यांना जननशक्ती असेलच. अरे, निसर्गाचं चक्र असंच चालायचं. अंडी देणाऱ्या कोंबड्या, दूध देणाऱ्या गाया, ओव्या म्हणणाऱ्या आया, घोषणा देणाऱ्या बाया .. सगळ्या निसर्गाला सारख्याच. तूच सांग. निसर्गानं स्त्री-पुरुष वेगवेगळे का बरं बनवले ?
पुरुष २ : ( रडायचा थांबून डोकं खाजवू लागतो ) का बरं ? ( गोंधळून ) तूच सांग.
पुरुष १ : त्याचं असं आहे, निसर्गात राजकारण चालतं.
पुरुष २ : पण राजकारणात निसर्ग कुठं चालतो ? ते जाऊ दे.
पुरुष १ : एक तरी पुरुष बाळंत झाल्याचं तुला ठाऊक आहे काय ?
पुरुष २ : हे माझ्या लक्षातच आलं नव्हतं ! ( टाळ्या वाजवतो. )
पुरुष १ : बायांनी पुरुषांवर बलात्कार केल्याच्या बातम्या तू वाचल्यात काय ?
पुरुष २ : ( टाळ्या वाजवून ) निसर्गाची लीला अगाध आहे !
पुरुष १ : हुंडा न दिल्यामुळं छळले गेलेले, स्वतःला जाळून घेणारे पुरुष तू पाहिलेत काय ?
पुरुष २ : ( टाळ्या वाजवून ) अहाहा !
पुरुष १ : संसाराला कंटाळून बाहेरख्याली बनलेल्या स्त्रियांची बाजू घेणाऱ्या स्त्रिया तू पाहिल्यात काय ?
पुरुष २ : ( टाळ्या वाजवून ) धन्य ! धन्य ! धन्य ती निसर्गाची करणी !
पुरुष १ : उगीच टाळ्या वाजवू नकोस. नीट ऐक. स्त्री ही नुसतीच उपयोगाची वस्तू नाही. किंवा ती नुसतीच उपभोगाचीही वस्तू नाही. स्त्री ही नुसती आई नाही, ती स्टेनोग्राफरसुद्धा आहे. स्त्री ही नुसती शाळेत शिकवणारी बाई नाही, ती कॅब्रेतसुद्धा नाचते. स्त्री ही नुसती पतिव्रता नाही, ती हॉस्पिटला-

तली नर्ससुद्धा असते. स्त्री ही नुसती एअर होस्टेस् नाही, ती देवीसुद्धा आहे. स्त्री नसती, तर काय झालं असतं? सांग, काय झालं असतं?

पुरुष २ : बाप, रे! हे आजवर माझ्या लक्षातच आलं नव्हतं!

पुरुष १ : कसं येणार? ज्या पुरुषाला निसर्गाची योजना कळलेली नाही, त्याला स्त्रीचा खरा उपयोग कसा कळणार? (पडद्याकडे तोंड करून ओरडतो) अरे, तो पुरुषांचा कोरस ऐकवा!

[पडद्यात कोरस सुरू होतो.]

कोरस पुरुषांचा :

तू हाण, गड्या, हाण आपुली बाई<br>
कोणाची हरकत नाई ॥<br>
स्वैंपाकघरी ती रमते<br>
खाटेवरसुद्धा दमते<br>
तव पोरांना हवीच असली आई<br>
तू हाण आपली बाई ॥<br>
स्वस्तात किती ती खपते<br>
जी हुंडापाणी देते<br>
तव देवांना हवीच असली देवी<br>
तू हाण आपली बाई ॥<br>
जरी मेली बाईल एक<br>
चालून येतील कितीक<br>
खाटकास जैशा गाई<br>
तू हाण आपली बाई ॥...

पुरुष २ : (कोरस संपताच) वा! वा! नव्या शिक्षण–क्रमात हे पद अंतर्भूत करायला हवं!

पुरुष १ : गप, रे! हे झालं बाईच्या एकूण कामाबद्दल. पण तू वात्स्यायनाची कामसूत्रं वाचलीत का?

पुरुष २ : नाही, बुवा!

पुरुष १ : अरे, स्त्री नुसती उपयोगाची नाही, तर चैनीची चीज आहे! नुसती ग्राहकांच्या सोयीचीच नाही, तर सुखाची गोष्ट आहे! दुर्दैवानं बहुतेक सर्व पुरुष मूर्ख. त्यामुळं स्त्रीचा पूर्णत्वानं उपयोग करणं त्यांना सहसा जमत नाही.

पुरुष २ : स्त्रीबरोबर सुख कसं भोगावं, चैन कशी करावी, ते तरी सांग !
पुरुष १ : सांगतो. ( पडद्याकडे पाहून ओरडतो ) अरे, वात्स्यायनाच्या कामसूत्राचा सारांश सांगा.

कोरस पुरुषांचा :

ती वयात जेव्हा येते, मर्दांनो !
घ्या फुसलावुन तिज सत्वर
कवळी असताना देते
ती मजा निराळी, मिष्टर !
मग ऐन उभारीमध्ये
तिज लावा आणिक गोडी
होण्यापूर्वी मध्यांतर !
नंतर ती पिकून पुरती फळफळेल, होईल गच्च
घ्या करून तेव्हा मस्ती ! मर्दांनो !

पुरुष २ : ( ढसाढसा रडू लागतो. ) काकी ! माझी त्रेसष्ट वर्षांची काकी ! आता माझ्या काकीचं काय होणार ?
पुरुष १ : सोपं आहे. सोपं आहे. वय उलटलेल्या बायांचा वेळ वयात येणाऱ्या मुलींना छळण्यात जातो. त्या सासवा होतात. किंवा त्या मुख्याध्यापिका होतात. किंवा त्या समाजसेविका बनतात. किंवा त्या राजकारणात पडतात.
पुरुष २ : म्हणजे काकीचा उपयोग आहे, तर ! ( टाळ्या वाजवतो. )
पुरुष १ : मूर्खा ! स्त्रिया स्त्रीत्वाचा जितका द्वेष करतात, तितका तर पुरुषांनासुद्धा मर्दुमकीचा ध्यास नसतो ! पुरुष रिटायर झाल्यावर कोणालाच त्रास देत नाहीत. बाया मात्र रिटायर व्हायच्या वयात थैमान घालायला सुरुवात करतात.
पुरुष २ : म्हणजे बायांच्या अंगात एवढी शक्ती असते ?
पुरुष १ : बायांच्या अंगात शक्ती असते, म्हणून तर त्या भांडीधुणी करतात. स्वयंपाकपाणी करतात. मुलंबाळं वाढवतात. नवऱ्यांची सेवा करतात. मात्र त्यांना अक्कल फारशी नसते. बायकांनी गुन्हे–लढाया केल्याचं कधी ऐकलंयस तू ? अरे, बायकांना कायम पुरुषाविषयी आशा असतात. त्यांना वाटतं, पुरुषच त्यांची सुटका करणार. काही झालं, तरी पुरुष बाईचा पोटचा गोळा म्हणून वाढतो. पण बायांना अक्कल येईपर्यन्त त्यांची जननक्षमता संपून जाते. याबाबत तू एक पोवाडा ऐक. हा बायकांचा पोवाडा आहे. पुरुषाबद्दल वैताग येऊन रचलेला ( पडद्याकडे ओरडून ) पोवाडा सुरू करा !

[ पडद्यात पोवाडा सुरू. ]

कोरस बायकांचा :

: पोवाडा ( १ ) :

मुलगा नवसासायासाने झाला
त्याला वाढवला
झाला राक्षस त्याचा शेवटाला
पुरुषाने पुरुष जनावर केला
जी, जी, जी, जी....

शिकवुनि गुंड त्याला बनविला
हो जी, जी, जी, जी

घरोघरी हुकुमशहा झाले
बहु माजले
मात्र हे गुलाम एकमेकांचे
पुरुषाने पुरुषही खच्ची केला
जी, जी, जी, जी
कमकुवत आक्रमक असा झाला
हो जी, जी, जी, जी

कोरस बायकांचा :

: पोवाडा ( २ ) :

चूक आमचीच आमच्या पदरी
आम्ही झालो आई
आम्ही झालो बाई
केल्या, ग, भूमिका मिळाल्या त्या
काक्या, माम्या, मावश्या आणि आत्या
बहिणी, मैत्रिणी किंवा भल्या
नाही टिकवला आत्मा आपला
हो जी, जी, जी, जी, जी

केले सहन यांचे थेर
नाना बलात्कार
राहिलो गपचिप पिंजऱ्यात

म. ग्रं. सं. आ
वा. क्र. 23348
वि. नाटक
१५।११।८८

मिळेल तो तुकडा पदरात
अखेरीस हक्क गमावुन वसलो
कपाळी कुंकु लावुनि सजलो
हो जी, जी, जी, जी, जी,

पुरुष १ : ऐकलंस ? तर याच विषयावर आपला आजचा खेळ आहे !
पुरुष २ : कसला खेळ ?
पुरुष ३ : नाटक म्हण, सर्कस म्हण, कीर्तन म्हण, तमाशा म्हण, या खेळात निसर्गाची गहन रहस्यं उकललेली आहेत. ( पडद्याकडे पाहून ) गाणं सुरू करा

प ड दा

: पद :
( अभंगाच्या परंपरागत चालीवर )

स्त्री–लिंग । पुल्लिंग । नपुंसकलिंग ।
कढईत तेल । फोडणीला हिंग ॥ १ ॥
देवा तुझे बिंग । शशकाचे शिंग ।
निरंतर इथे । चाले ट्रिंग ट्रिंग ॥ २ ॥
सुखाचाच पाटा । सुख वरवंटा ।
फुलपाखराचा । ध्यास सुरवंटा ॥ ३ ॥
मुक्त होण्याचीच । आता आहे खोटी ।
जन्माचा कासोटा । जन्माची लंगोटी ॥ ४ ॥
स्त्री–लिंग, पुल्लिंग । नपुंसकलिंग ।
फडफडतात । पोपटाचे विंग ॥ ५ ॥

## दृश्य सहावे

( गाणं : मिठ्ठू मिठ्ठू पोपट )

[ पडद्यात ढोलाचा आवाज सुरू होतो. ढोल थांबताच पोपटाचे बोलणे सुरू होते. ]

पोपट : पुन्हा एक मुलगी ! ही कोवळी दिसतेय् ! कच्ची कुमारिकाच दिसतेय् ! धड गुलाम नाही, धड स्वतंत्र नाही ! मातीचा गोळा ! पुरुषाचा हात लागल्या-

शिवाय हिला आकार यायचा नाही !

[ पोपट उतरून खाली येतो. मुलीसमोर येऊन उभा राहतो. मुलगी दचकून त्याच्याकडे पाहते. ]

मुलगी : तुम्ही कोण ? काय हवंय् तुम्हांला ?
पोपट : मी पोपट. मी कवी आहे.
मुलगी : अय्या ! तुम्ही पोपट ! तरीच तुमची चोच लालचुटुक दिसतेय् ! मी खूप ऐकलंय् तुमच्याविषयी !
पोपट : काय ऐकलंय् ?
मुलगी : मुलींनी तुमच्या वाटेला जाऊ नाही, म्हणून !
पोपट : ते खरं आहे. मग तू माझ्या वाटेला का आलीस ?
मुलगी : ही वाट तुमची आहे, हे मला ठाऊक नव्हतं.
पोपट : काही वर्षांपूर्वी तुझी आई याच वाटेनं गेली. मला वाटतं, वीस वर्षं झाली त्या गोष्टीला.
मुलगी : वीस वर्षं ! बाप, रे ! म्हणजे तेव्हा आईचं लग्नही झालेलं नव्हतं.
पोपट : तुझं वय काय ?
मुलगी : सतरा.
पोपट : तेव्हा तुझी आई तुझ्यापेक्षा एक-दोन वर्षांनीच मोठी होती. चांगली उफाड्याची होती, तुझ्यापेक्षा जास्त भरलेली होती अंगानं. तिला सेक्स अपील पण जास्तच होतं.
मुलगी : ( हसत सुटते ) सेक्स् अपील ? आमच्या आईला ? तुम्ही भलतेच विनोदी दिसता !
पोपट : का ? तुझ्या आईला का सेक्स् अपील नसावं ?
मुलगी : ( हसत, मान हलवत राहते. ) मला तर कल्पनाच करवत नाही !
पोपट : मीच तिला प्रेम करायला शिकवलं.
मुलगी : काय ? आमची आई प्रेमसुद्धा करायची ?
पोपट : का ? तुझ्या आईनं काय घोडं मारलंय् कुणाचं ? तिनं का प्रेम करू नये ?
मुलगी : नाही, म्हणजे प्रेम करायला हरकत नाही. पण आमच्या आईला तसलं काही जमलं असेल, असं वाटत नाही.
पोपट : जमलं नसेल कदाचित. पण तिनं प्रयत्न मात्र केला होता तसा. अगदी मनापासून.
मुलगी : म्हणजे काय केलं ? तुमच्याबरोबर ड्यूएट वगैरे गायली, की काय, आमची

आई ?

पोपट : ड्यूएट् गायला तिचा आवाज योग्य नव्हता. पण मी तिला प्रथम चुंबन द्यायला घ्यायला शिकवलं.

मुलगी : ( रागाने ) आमच्या आईबद्दल असलं काही मी ऐकून घेणार नाही ! माझी आई माझ्या वडलांशी एकनिष्ठ आहे !

पोपट : तेवढं एकच तिचं चुकलं. मी तिला सतत सांगायचो, की एकनिष्ठ वगैरे राहू नकोस.

मुलगी : ( जास्त रागाने ) सभ्य माणसांविषयी उगाच भलतंसलतं बोलू नका !

पोपट : तुझी आई तेव्हा अजिबात सभ्य नव्हती. अतिशय गोड स्वभाव होता तिचा ! पुढं ती एकनिष्ठ झाल्यावर मग सभ्य झाली. तेव्हापासून तिला प्रेमसुद्धा करता येईनासं झालं !

मुलगी : सभ्य माणसांना काय प्रेम करता येत नाही ?

पोपट : सभ्य माणसांना काय करता येतं ? सभ्य माणसं पिंजऱ्यात राहतात. पैसा मिळवतात. प्रतिष्ठा मिळवतात. संसार करतात. बँकेत खातं उघडतात. विमा उतरवतात. पण त्यांना प्रेम वगैरे करता येत नाही. प्रेम, क्रांती, बंड, वगैरे काही निवडक गोष्टी तरुण वयात कराव्याशा वाटतात. नंतर मग त्या गोष्टींची भीतीच वाटते.

मुलगी : काही तरी काय ? आमच्या शेजारी–पाजारी सर्व लोक प्रेम करतात.

पोपट : कुठं करतात ? तू पाहिलंयस प्रेम ?

मुलगी : ( गोंधळते ) असं मी ऐकलंय् ! ( थांबते. विचार करते. ) असं मी सिनेमात पाहिलंय्. गाण्यांत ऐकलंय्. पुस्तकात वाचलंय्.

पोपट : त्याचा तुला काहीच उपयोग नाही. शरीरसुख म्हणजे काय, हे तुला ठाऊक आहे का ?

मुलगी : ( जरा लाजते. किंचित चिडते. ) असेल किंवा नसेल ! तुम्हांला काय करायचंय् ?

पोपट : तुझ्या आईला जाऊन विचार !

मुलगी : आईला कशाला विचारू ?

पोपट : बरं, मग वडलांना विचार.

मुलगी : ( चिडून ) माझं मी बघून घेईन !

पोपट : हां ! थांब, थांब ! तुझं तू बघून घेशील ? कसं ? एका हातानं टाळी वाजवून ?

मुलगी : एका हातानं टाळी कुठं वाजते ?

पोपट : सगळं जग एका हातानंच टाळी वाजवतं. आपलं आपण जर बघून घेता

येतं, तर एका हातानं टाळी का वाजू नये ?

मुलगी : तुम्हांला काय म्हणायचंय् ? मला समजत नाही.

पोपट : तू कधी जत्रेतल्या चक्रात बसलीयस ?

मुलगी : हो.

पोपट : मग कसं वाटतं ?

मुलगी : गर्र गर्र ( तंद्रीत जाते )...गर्र गर्र...वर जाताना पोटात खड्डा पडतो. अगदी उंच गेल्यावर पुढं एकदम खाली जाताना आनंद होतो, भीती वाटते, आनंद होतो, भीती वाटते. ( थांबते. ) नंतर गर्कन् खोल खाली येताना भोवळ येते....

पोपट : प्रेम करताना तसंच होतं काहीसं, पण जास्त उंच. जास्त खोल. जास्त गर्र गर्र...जास्त वर. जास्त खाली. जास्त गरा गरा. जास्त भरा भरा. जास्त जलद. नुसती उघडझाप, उघडझाप, उघडझाप...काहीतरी गच्च पकडीतून ठेवावंसं वाटतं. सगळंच पकडीतून निसटतंय् असं वाटतं. अति नाजूक. अति राकट.

मुलगी : ( एकटक बघत ऐकते. ) मला भीती वाटतेय्...मला भीती वाटतेय् तुमच्या बोलण्याची....मला आनंद होतोय्...मला भीती वाटतेय्....आनंद होण्याची.

पोपट : अर्थात तू स्त्री आहेस. तुला मूल-बील होण्याची भीती आहेच.

मुलगी : त्यात भिण्यासारखं काय आहे ? आधीच लग्न करायचं....

पोपट : छीः छीः ! एवढया कोवळ्या वयात लग्नाचा विचार ?

मुलगी : का ? सगळेच लोक लग्न करतात.

पोपट : पण लोक लग्न का करतात ?

मुलगी : एकत्र राहायला मिळावं, म्हणून.

पोपट : का ? लग्न केल्याशिवाय एकत्र राहता येत नाही ?

मुलगी : मग का ? आडनाव बदलायला ?

पोपट : आडनाव बायका बदलतात, कारण त्या गुलाम होतात. नंतर त्या फुकट नवऱ्याबरोबर राहातात. तो म्हणेल, ते करतात. कामं करतात. मर मर मरतात. मुलांना जन्म देतात. खरं तर, स्त्री ही एक दैनंदिन उपयोगाची वस्तू आहे. हल्ली मात्र ती चैनीची वस्तू झालीय् , कारण सर्वच वस्तू महागल्यात. भाववाढ ! दुसरं काय ?

मुलगी : ( चिडून ) स्त्री स्वतंत्र आहे. तिला स्वतःचं व्यक्तित्व आहे. हल्ली तर ती पुरुषाच्या जोडीनं काम करते !

पोपट : पुरुषाच्या जोडीनं काय, ती डबल कामसुद्धा करते. कारण ती डबल गुलाम

असते. मुख्य म्हणजे ती स्वखुशीनं डबल गुलाम बनते !

मुलगी : तुमची मतं इतकी जुनाट असली, तर तुम्हांला प्रेम कशावरून करता येतं ?

पोपट : ही माझी मतं नाहीत. ही बायकांची परिस्थिती आहे.

मुलगी : ( तुच्छतेने ) तुम्हांला बायकांचा अनुभव नाही, असं दिसतंय् !

पोपट : मला तर बायकांचा अनुभव आहेच, पण बायकांनाही माझा अनुभव आहे. साधारणपणे प्रत्येक बाईला खऱ्याखुऱ्या प्रेमाचा आणि स्वातंत्र्याचा अनुभव देऊन मी तिच्यापासून बाजूला होतो. मी जास्त मोहात पडत नाही.

मुलगी : म्हणजे तुम्ही त्यांचा फायदा घेता !

पोपट : फायदा ? यात फायद्या–तोट्याचा काय प्रश्न आहे ? मला त्यांचा सहवास आवडला, तर मी वर्षानुवर्ष त्यांच्या सहवासात राहीन. पण लग्नासारखे व्यापारी करार–मदार करायला मला आवडत नाही.

मुलगी : व्यापारी करार–मदार ?

पोपट : नाहीतर काय ? लग्न म्हणजे व्यापारच. पुरुषानं अमुक–अमुक द्यायचं, अमुक–अमुक घ्यायचं. बाईनं अमुक–अमुक द्यायचं, अमुक अमुक घ्यायचं. तुझ्या आईचं माझ्यावर प्रेम होतं, असं ती म्हणायची. पण तिला हव्या असलेल्या वस्तूंची यादी भलतीच मोठी होती. प्रेम मूठभर, यादी हातभर ! म्हणून तिनं भलत्याच माणसाशी लग्न केलं. तेही ठीकच झालं, म्हणा. कारण तिला तेच हवं होतं ...खरं तर, बायकांना प्रेम नको असतं. सुरक्षितता हवी असते. प्रेमाचा सुरक्षितपणाशी काहीच संबंध नाही. सुरक्षितपणा हे पोलिसाचं काम, प्रियकराचं नव्हे.

मुलगी : तुम्ही स्वातंत्र्याचे कमिशनर दिसता !

पोपट : ( आसनाकडे चालत जातो, जाऊन बसतो. ) या भानगडीमध्ये मी कधी गुंतत नाही.

मुलगी : ( मान उंच करून त्याच्याकडे बघत ) अहो, पण मला कुमारीच राहायचंय्.

पोपट : असं ? मग त्या पिंजऱ्यात जाऊन उभी राहा.

मुलगी : पिंजऱ्यात ? का ?

पोपट : कुमारी राहून कोणाला स्वातंत्र्य मिळत नाही. कुमारी राहण्याला लग्नापुरतीच किंमत असते. तू पिंजऱ्यात जाशील, तर हां हां म्हणता तुझं सगळं ठीक होईल. फक्त कडी नीट लावून घे !

मुलगी : पोपट ! अहो पोपट ! पोपट !

[ सर्व दिवे विझून जातात. पडद्यात सनई वाजते. पुन्हा प्रकाश. मुलगी

आता पिंजऱ्यात गेलेली आहे. ]

मुलगी : पो ऽ पट ! पोपट ! पोपट ?
पोपट : काय आहे ? ( तिच्याकडे बघून ) मी तपश्चर्या करतो आहे, दिसत नाही ?
मुलगी : कशासाठी एवढी तपश्चर्या ?
पोपट : तुला मुक्ती मिळावी, म्हणून.
मुलगी : पण...पण...अहो पोपट...
पोपट : नुस्तंच पोपट म्हणतेस मला ?
मुलगी : मग काय म्हणू ?
पोपट : पोपटमुनी म्हण...किंवा महर्षी पोपट म्हण...किंवा महाकवी पोपट म्हण... किंवा भगवान् पोपट म्हण...मी परमेश्वराचा अवतार आहे.
मुलगी : कशावरून ?
पोपट : तुला संस्कृत किंवा मराठी व्याकरण समजतं का ? परमेश्वराचं लिंग कोणतं असतं बरं ?
मुलगी : ( लाजते ) असले चावट प्रश्न मला एकान्तात विचारू नका !
पोपट : काय ? पिंजऱ्यात राहूनही तुला साधारण व्याकरणसुद्धा ठाऊक नाही ? ( दरडावून ) सांग बरं ! परमेश्वराचं लिंग कोणतं ?
मुलगी : ( घाबरून, थराथरा कापत ) देवाशप्पत सांगते हो. मी ते अजून पाहिलेलं नाही.
पोपट : बरं. परमेश्वर खाते, की खातो ?
मुलगी : मला वाटतं...परमेश्वर खातो.
पोपट : करेक्ट ! बरं, परमेश्वर पावतं, की पावते ?
मुलगी : मला वाटतं...परमेश्वर पावतो !
पोपट : ( दरडावून ) तुला कधी पावलाय् का परमेश्वर ? खोटं बोलतेस ?
मुलगी : नाही. मला परमेश्वर पावलेलं नाही...किंवा मला परमेश्वर पावलेली नाही.. किंबहुना मला परमेश्वर पावलेलासुद्धा नाही !
पोपट : ( आसनावरून उतरून येऊन तिचा पिंजरा उघडतो ) परमेश्वर पुल्लिंगी आहे. कोणालाही विचार.
मुलगी : ( भेदरून ) असू दे. असू दे. मी कुठं नाही म्हणतेय् ?
पोपट : ( पार्टिशनकडे बोट करून ) ते पाहिलंस का ? काय आहे ? ठाऊक आहे ?
मुलगी : ( घाबरून ) डॉक्टर पुल्लिंगी असतो. डॉक्टर पुल्लिंगी असतो.
पोपट : मी डॉक्टरबद्दल विचारत नाही. तिथं काय आहे ?
मुलगी : खरंच, हो, पोपटेश्वर ! मला ठाऊक नाही...

पोपट : ( तिला हात धरून पार्टिशनमध्ये नेत ) मी तुझं अज्ञान दूर करतो.

मुलगी : ( घाबरून ) प्लीज ! बाकी वाटेल ते दूर करा, हो, पोपटदेव; पण प्लीज, माझं अज्ञान दूर करू नका. मला भीती वाटते. माझं असं तेवढंच आहे माझ्यापाशी.

पोपट : अज्ञानात सुख असतं, असं त्यांनी तुला शिकवलं असणार ! पण साफ चूक आहे ते ! आज मी तुझा संशय फेडणार आहे. आज मी तुझं अज्ञान दूर करणार आहे. आज मी तुला व्याकरण शिकवणार आहे...

मुलगी : नको, हो, पोपट ! मला व्याकरणाची फार भीती वाटते.

पोपट : व्याकरणाची भीती वाटते ? अग, खरी गंमत व्याकरणातच आहे. ( बेभानपणे मंत्रोच्चार केल्याप्रमाणे ) म्हण : पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग...

मुलगी : ( चाचरत ) पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग...

पोपट : भराभरा म्हणत राहा : पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग...

[ मुलगी म्हणू लागते. दोघे पार्टिशनमध्ये जातात. जोराजोराने घोकू लागतात : ' पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग ! ' पडद्यात डमरू वाजू लागतो. गुदगुल्या झाल्याप्रमाणे मुलगी हसू लागते. मधूनच ' पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग ' म्हणू लागते. हसणं अनावर. मध्येच पोपटाचा आवाज. मुलीचं हसणं वाढतं. अचानक थांबतं. पोपट कण्हू लागतो. कुथू लागतो. पडद्यात गडगडाट. दिवे जातात.
गडगडाट थांबून पुन्हा लख्ख प्रकाश. आत्मविश्वासाने मुलगी पार्टिशनमधून बाहेर येते. तिच्या मागून कण्हत, लंगडत, हातात बादली घेऊन पोपट बाहेर येतो. ]

पोपट : झालं समाधान ? आता कृपा करून त्या पिंजऱ्यात परत जा कशी !

मुलगी : का ? इथं कसं मस्त वाटतंय् ! ( भारावल्याप्रमाणे ) नपुंसकलिंग ! नपुंसकलिंग ! खरंच व्याकरणात इतकी गंमत आहे, हे मला ठाऊकच नव्हतं !

पोपट : ( चिडचिड्या स्वरात ) आता स्वयंपाक करायला शीक !

मुलगी : ( पिंजऱ्यात जात ) मास्तर, वडा म्हणजे पुल्लिंगी आणि चटणी म्हणजे स्त्रीलिंगी, असं का बरं ?

पोपट : ( बादली घेऊन आसनाकडे जातो. बादली ठेवून बसतो. ) त्याचं असं आहे... ( दीर्घ उसासा टाकतो. ) सांबार नपुंसकलिंगीच का, हे अजून भल्याभल्यांना कळलेलं नाही.. व्याकरणातच लिंगं नसती, तर जीवन किती

सोपं होतं!...जाऊ दे...मला पुन्हा तपश्चर्या करणं भाग आहे. (डोळे मिटतो. पुन्हा अंधार.)

दृश्य सातवे

[पोपट आपल्या आसनावरून उठून नव्या स्त्रीच्या पिंजऱ्याकडे चालत येतो. पडद्यात शंखनाद. डमरूचा आवाज.]

पोपट : संसार हा असार आहे. संसार हा असार आहे. (डमरू)
स्त्री : अहो! शूः! शूः!
पोपट : हा आलोच! तुला काय पाहिजे, मोक्ष?
स्त्री : मला या पिंजऱ्यातून बाहेर काढता का?
पोपट : जरा दम धर, बाई. दम धर. इतकी वर्षं तू इथंच तर राहिलीस.
स्त्री : इतकी वर्षं मला तुमच्यासारखा पंखवाला देवदूत दिसलाच नव्हता. आता मी बाहेर यायला अधीर झालेय्.
पोपट : मला नुमते पंखच नाहीत, चोचसुद्धा आहे. (डमरू)
स्त्री : चोच? देवदूतांना चोचसुद्धा असते?
पोपट : देवदूतांना वाट्टेल ते असतं! त्यांना नखं असतात, दात असतात. केस असतात. त्यांना टक्कल असू शकतं. कवळ्या असू शकतात. चश्मा असू शकतो. देवदूतांची अनेक रूपं असू शकतात. (डमरू)
स्त्री : तुम्ही कोण?
पोपट : आम्ही कोण म्हणून काय पुससि, आम्ही असू लाडके
देवाचे; दिधले असे जग तये आम्हांस खेळावया...

[डमरू]

स्त्री : तुम्ही मराठीचे मास्तर आहात?
पोपट : मी मराठीचा ग्रँडमास्टर आहे.
स्त्री : मराठीचे बँडमास्तर?
पोपट : बँडमास्तर नाही, ग्रॅण्डमास्टर! तुला बुद्धिबळांच्या खेळाविषयी काहीच माहिती दिसत नाही! बरं, काय प्रॉब्लेम आहे तुझा?
स्त्री : तसं काही विशेष नाही, हो....आपलं...आपलं...बाहेर पडावंसं वाटतंय् जरा...कंटाळा येतो, हो, ह्या पिंजऱ्यात सारखं राहायचं म्हणजे....

पोपट : अस्सं... ! का, ग, तुझा जन्म कुठला ?

स्त्री : इथलाच.

पोपट : काय ? ह्या पिंजऱ्यातच जन्मलीस तू ?

स्त्री : इथला...म्हणजे या पिंजऱ्यातला नाही.

पोपट : असं बोल की. माहेरचा पिंजरा जरा वेगळा असणारच. मग प्रॉब्लेम् काय आहे तुझा ? खरं बोल !

स्त्री : नाही म्हणजे . आमचे हे तसे चांगले आहेत, हो...

पोपट : आलं लक्षात....सगळेच 'हे' 'तसे' चांगलेच असतात...काय पगार मिळतो तुला ?

स्त्री : मी काही सर्व्हिसबिर्व्हिस करत नाही.

पोपट : ते नाही विचारत मी. पिंजऱ्यात राहायचा काय पगार मिळतो ?

स्त्री : पिंजऱ्यात राहायचा पगार ?

पोपट : नाही, म्हणजे तुमचे 'हे' तुम्हांला काय देतात ?

स्त्री : सगळा पगार आणून देतात.

पोपट : मग ते कोणत्या पिंजऱ्यात असतात ?

स्त्री : ऑफिसातून सरळ घरी येतात !

पोपट : येताना भाजीसुद्धा आणत नाहीत ?

स्त्री : बाजार आम्ही दोघं मिळून करतो.

पोपट : वा ! वा ! सिनेमा-नाटकं बघता, की नाही ?

स्त्री : महिन्यातून एक तरी मराठी नाटक आणि दोन तरी हिंदी सिनेमे बघतोच बघतो आम्ही.

पोपट : आणि तरी तुला कंटाळा आलाय् ?

स्त्री : नाही. म्हणजे...

पोपट : सणासुदीला साड्याबिड्या घेत असालच ! मुलं-बाळं ?

स्त्री : आहेत की...एक मुलगी, एक मुलगा...

पोपट : वा ! वा ! म्हणजे तुम्ही निसर्गाचे आणि समाजाचे मुख्य नियम पाळता, असं दिसतंय् ! वा ! वा ! मग ? उगाच बाहेर कशाला पडायचं म्हणतेस, बाई ? बरं चाललंय् की तुझं...

स्त्री : तसं बरं चाललंय् , हो. पण ह्या खिडकीतून रहदारी बघायचा फार कंटाळा येतो...शिवाय मी ऐकलंय् , की पिंजऱ्याबाहेर फार गंमत असते !

पोपट : गंमत ? गंमत वाटते तुला ही ? पिंजऱ्याबाहेर वादळं आहेत वादळं! पिंजऱ्याबाहेर सैराट वारे आहेत, धुवाधार पाऊस आहे, वैराण वाळवंट आहे पिंजऱ्याबाहेर प्रेमाचं असुरक्षित जग आहे ! ( डमरू )

स्त्री : प्रेमाचं ? खरंच ! प्रेम कसं असतं, हो ?
पोपट : प्रेम ! प्रेम पिंजऱ्यातल्या माणसांना कळणं अशक्य आहे ! ( डमरू. )
स्त्री : मला अगदी थोडा वेळ बाहेर काढता का ? फक्त एकदाच. फक्त एकदाच मला प्रेमाचा अनुभव घ्यायचाय् . फक्त....
पोपट : नंतर परत पिंजऱ्यात जावंसं वाटलं नाही, तर ?
स्त्री : शप्पथ ! मी गुपचूप परत येईन.
पोपट : प्रॉमिस ?
स्त्री : शप्पथ ! ह्यांची, मुलाबाळांची शपथ !
पोपट : प्रेम म्हणजे काय स्मगलिंगचा माल वाटला तुला ? स्वातंत्र्य म्हणजे काय काळ्या बाजारातलं घासलेट वाटलं तुला ? का हिंदी सिनेमा वाटला ? का मराठी नाटक वाटलं ? जे बघून सुरक्षित परत पिंजऱ्यात येता येतं ? मी तुला बाहेर काढीन, पण एका अटीवर. परतीची वाट तुझी तू शोध. काही झालं, तरी माझ्यासारख्या द्रष्ट्यालाही काही नैतिक तत्त्वं पाळावी लागतात ! कबूल ?
स्त्री : कबूल ! कबूल ! काढा ना मला बाहेर !
पोपट : बरंय् तर ! ( तिला बाहेर काढतो. ती बाहेर पडून डोळे मिटून जोरात श्वास घेते. ) माझं नाव पोपट, बरं का ! ( ती डोळे उघडते. )
स्त्री : पोपट ? पोपट! पोपट ! किती सुंदर नाव आहे तुमचं ! ( आजूबाजूला बघते. ) किती विलक्षण आहे इथली हवा ! ( पार्टिशनकडे बोट दाखवून ) तिथं काय आहे ?
पोपट : ब्रह्म !
स्त्री : ब्रह्म ! मला तर ते डॉक्टरांच्या दवाखान्यात पाहिल्यासारखं वाटतंय् !
पोपट : ब्रह्म सर्वत्र असतं. आणि ब्रह्म कुठंही नसतं. गुरू केल्याशिवाय ब्रह्माचा अनुभव येत नाही.
स्त्री : गुरू ? मलाही गुरू करावासा वाटतो, हो !
पोपट : त्यासाठी तुला शिष्या व्हावं लागेल. ( पार्टिशनकडे बोट करून ) तिकडे चल, सांगतो सगळं.
स्त्री : तिकडे काय आहे ? ( टाळ्या वाजवत ) हं ! कळलं ! तिकडे तुमचे कोचिंग क्लासेस् आहेत. होय ना ?
पोपट : कोचिंग क्लासेस् ? तिकडे माझा आश्रम आहे. तिकडे माझी शेतीवाडी आहे. तिकडे माझा किल्ला आहे. तिकडे माझा कारखाना आहे...

[ डमरू. ]

स्त्री : कारखाना ? काय तयार करता तुम्ही तिथं ?
पोपट : तुलासुद्धा तयार करीन.
स्त्री : ( साशंकपणे ) खरं सांगा, तिथं काय आहे ?
पोपट : ज्ञानवृक्षाचं फळ.

[ डमरू. ]

स्त्री : कसलं फळ ?
पोपट : तू बायबल वाचलेलं दिसत नाही !
स्त्री : बायबल ? कोणी लिहिलंय् बायबल ?
पोपट : जाऊ दे. तू ऋग्वेद तरी वाचलायस का ?
स्त्री : नाही. आमच्या घरी फक्त 'महाराष्ट्र टाइम्स' येतो. आणि सर्क्युलेटिंग लायब्ररीची मी मेंबर आहे.
पोपट : सर्क्युलेटिंग लायब्ऱ्या कायद्यानं बंद केल्या पाहिजेत.
स्त्री : का ?
पोपट : त्या अज्ञानाचा प्रसार करतात, म्हणून !
स्त्री : ( भांबावून ) मग माणसानं वेळ कसा घालवायचा ?
पोपट : वेळ घालवायचा नसतोच मुळी. माणसाला वेळ नसतोच मुळात.
स्त्री : मला तर, बाई, रोज पुष्कळ वेळ असतो.
पोपट : तो तुझा भ्रम आहे.
स्त्री : भ्रम ? भ्रम कसा ? तुम्हांला कधी कंटाळा येत नाही का ?
पोपट : आम्ही परमेश्वराची लाडकी माणसं. आम्हांला कंटाळा कसा येईल ? का येईल ? का यावा ? आम्ही सतत मनोरंजनात मग्न असतो. ब्रह्म म्हणजे कायम मनोरंजन. ( डमरू. ) संसार हा असार आहे...
स्त्री : ( पार्टिशनकडे बोट दाखवून ) खरं सांगा ! तिकडे काय आहे ? मला अगदी उत्कंठा लागलीय् कळून घ्यायची !
पोपट : तिथं काय आहे ? ( डमरू ) तिथं काय नाही ! ( डमरू )
स्त्री : फक्त एकदा...
पोपट : फक्त एकदाच ? ( डमरू ) फक्त एकदाच जन्म. फक्त एकदाच मरण. फक्त एकदाच बारसं. फक्त एकदाच जावळ. फक्त एकदाच... ( डमरू ) फक्त एकदाच वयात येणं. फक्त एकदाच प्रौढ होणं. ( डमरू. )
स्त्री : ( भांबावल्याप्रमाणे त्याचं बोट धरून पार्टिशनकडे जाताना ) फक्त एकदाच ....फक्त एकदाच !

पोपट : ( दोघंही पार्टिशनआड गेल्यावर ) फक्त एकदाच अविचार. फक्त एकदाच समाधी !

[ डमरूचा आवाज. आत किंकाळ्या. हसणं. रडणं.
स्त्री बाहेर येऊन निश्चल उभी राहते.
पोपट विव्हळत विव्हळत हातात मोडकी छत्री आणि जुनं वर्तमानपत्र घेऊन येतो. रंगभूमीच्या पुढील भागात येऊन वर्तमानपत्र वाचत–वाचत स्वगत बोलतो. ]

पोपट : बाया आणि बातम्या ! बाया आणि बाया आणि बाया ! बातम्या, बातम्या, बातम्या ! आत्महत्या आणि खून आणि बलात्कार ! फसवणुका ! निवडणुका ! बढाया ! लढाया ! चढाया ! अफरातफर ! बालंट ! बोंबाबोंब ! बॉम्बफेक ! झोंबाझोंब !

[ मान हलवतो. छत्री, वर्तमानपत्र घेऊन आसनावर जाऊन बसतो. पडद्यात डमरू वाजतो. अंधार. ]

## दृश्य आठवे :

[ पोपटावर प्रकाशझोत. लष्करी आगेकूच होतानाचे संगीत. पोपट आसनावरून उतरून स्त्रीच्या पिंजऱ्याकडे येतो. प्रकाशझोत त्याच्याबरोबर सरकतो. स्त्री गजांजवळ येते. ]

स्त्री : ऊठ. ऊठ ! निर्वाणीचा दिवस आला !
पोपट : ( जांभई देत ) निर्वाणीचा दिवस, की रात्र ?
स्त्री : निर्वाणीच्या दिवसाची रात्र !
पोपट : नि ..?
स्त्री : मग आता काय करायचं ?
पोपट : काय करायचं ? हा काय प्रश्न झाला ? मी पुरुष आहे, तू स्त्री आहेस. आपण एकान्तात आहोत.
स्त्री : मग आता काय करायचं ?
पोपट : काय करायचं ? हा काय प्रश्न झाला ? स्त्री-पुरुष एकान्तात काय करतात ? तू पिंजऱ्यात आहेस, मी बाहेर आहे.

स्त्री : मग तू पिंजऱ्यात ये. मी पिंजऱ्याबाहेर येते.

पोपट : पिंजऱ्यात जनावरांना ठेवतात. स्त्री जनावर असते. मी देवदूत आहे.

स्त्री : तू कोण ?

पोपट : आम्ही कोण म्हणून काय पुससि आम्ही देवाचे, असू लाडके.

स्त्री : कोणता देव ?

पोपट : देव पुरुष आहे.

स्त्री : पुरुष म्हणजे काय असतं ?

पोपट : (बाहू फडफडावत पिंजऱ्याभोवती फिरत) पुरुष, पुरुष, पुरुष. पुरुष म्हणजे पुरुष.

स्त्री : पुरुष म्हणजे ?

पोपट : (बाहू फडफडावत पिंजऱ्याभोवती फिरत) पुरुष म्हणजे दाढी. पुरुष म्हणजे मिशा...

स्त्री : पुरुष म्हणजे काय ?

पोपट : (पिंजऱ्याभोवती फिरत) पुरुष म्हणजे घोडा, पुरुष म्हणजे बैल. पुरुष म्हणजे रेडा, पुरुष म्हणजे हत्ती.

स्त्री : पुरुष म्हणजे काय ?

पोपट : (पिंजऱ्याभोवती फिरत) पुरुष म्हणजे खांब! पुरुष म्हणजे खुंट. पुरुष म्हणजे सोटा. पुरुष म्हणजे वत्ता. पुरुष म्हणजे वरवंटा.

स्त्री : (जांभई देते.) पुरुष म्हणजे– कंटाळा आला, ग, बाई!

पोपट : (अचानक थबकून, पिंजऱ्याचे गज पकडून) तुझं वय काय ?

स्त्री : असेल सतरा–अठरा.

पोपट : फक्त सतरा–अठरा ?

स्त्री : असेल चोवीस–पंचवीस !

पोपट : चोवीस–पंचवीस ?

स्त्री : असेल छत्तीस–सदतीस.

पोपट : छत्तीस–सदतीस ?

स्त्री : असेल सत्तर–बहात्तर.

पोपट : बहात्तर ? मागून–पुढून दोन्हींकडून तू वय चोरतेयस. खरं बोल.

स्त्री : उजवीकडून डावीकडून, वरून-खालून, पाठीमागून पुढून आपलं वय एक थोडंच असतं ?

पोपट : ते जाऊ दे. तू कुमारिका आहेस, विवाहिता आहेस, की विधवा आहेस ?

स्त्री : कुमारिका म्हणजे काय ?

पोपट : कुमारिका, म्हणजे बंद शिंपला. कुमारिका, म्हणजे कळी. कुमारिका,

म्हणजे... म्हणजे...

स्त्री : कुमारिका कोणत्या समुद्रात सापडते? कुमारिका कोणत्या झाडावर उगवते?

पोपट : तुला काहीच ठाऊक दिसत नाही. स्त्री म्हटली, की धूर्त असते. कुमारिका, म्हणजे झाकली मूठ.

स्त्री : माझी मूठ तर उघडी आहे! (पिंजऱ्याबाहेर हात काढून तळहात पसरते.)

पोपट : (दार उघडून तिला बाहेर ओढतो.) बाहेर ये! बाहेर ये! तुझं अज्ञान मी दूर करतो.

स्त्री : कशाला उगीच? मला कंटाळा आलाय्. (जांभई देते.) झोप येतेय्.

पोपट : सर्व स्त्रियांना नेहमीच झोप येते. भगवान् श्रीकृष्णाच्या सोळा हजार आठ बायका नेहमी झोपत. पण तो मात्र सतत जागा राहत असे. कारण तो संयमी होता.

स्त्री : (पोपटाभोवती फिरत राहते.) तुझा रंग तर हिरवागार आहे.

पोपट : कारण मी एव्हरग्रीन आहे.

स्त्री : तुझी चोच तर लाल आहे.

पोपट : कारण मी रंगेल आहे.

स्त्री : तुझं बोलणं तर संपतच नाही.

पोपट : कारण मी महाकवी आहे.

स्त्री : मग आता करायचं?

पोपट : आता काय करायचं? आत चल. त्या तिथं – पलीकडे – तिकडे, मग तू भानावर येशील.

[ तिला पार्टिशनमागे घेऊन जातो. पार्टिशनवर लयबद्ध, लालभडक प्रकाशाची उघडझाप. पडद्याआड ढोलाचा आवाज.
ढोल थांबतात, आत स्त्रीच्या अनिर्बंध हसण्याचा आवाज. फट्कन् सर्वत्र प्रकाश. ]

स्त्री : (हातात एक लांबलचक लाल रंगाचा पायमोजा घेऊन बाहेर येते. तिच्या पाठोपाठ पोपट लंगडत–लंगडत एका हातात बूट घेऊन येतो.) कुमारिका, म्हणजे काय बरं?

पोपट : माझा मोजा परत दे पाहू.

स्त्री : (मोजा हातात धरून, हात उंचावून) कुमारिका म्हणजे पायमोजा.

पोपट : छेः छेः ! कुमारिका म्हणजे दिलरुबा !
स्त्री : कुमारिका म्हणजे पार्टिशन् !
पोपट : छेः छेः ! कुमारिका म्हणजे कविता !
स्त्री : तुझी आई कुमारिका होती काय ?
पोपट : माझी आजी कुमारिका होती. माझी पणजी कुमारिका होती. माझी खापर-पणजी कुमारिका होती· ( थोडा वेळ विचार करून ) आमच्या घराण्यात ते आनुवंशिक आहे.
स्त्री : तर मग तूही कुमारिका आहेस काय ?
पोपट : हो ? अं....छेः छेः ! मी तर पुरुष आहे.
स्त्री : पुरुष आनुवंशिक कुमारिका नसतात ?
पोपट : कोण म्हणतो पुरुष आनुवंशिक असतात ? पुरुष अपवाद असतात. स्त्रिया नियम असतात. असा जगाचा कायदाच आहे. ( तिच्याभोवती गोल–गोल फिरत म्हणू लागतो– )

जगणे, मरणे, जागणे, उठणे, झोपणे !
धावणे, पडणे, उडणे, चढणे, उतरणे !
जगून, मरून, चढून, उतरून, थकून !
उडून, पडून, अडून, पुढून, मागून !

स्त्री : ( पायमोजा उंचावून ) हे काय आहे ?
पोपट : ( थांबतो. डोळ्यांवर हात धरून टक लावून पायमोज्याकडे पाहत ) यात तर माझे पंचप्राण आहेत,
स्त्री : पुरुष म्हणजे पायमोजा.
पोपट : ( इतका वेळ हातात धरलेला बूट खाली टाकून देतो. ) परमेश्वरा ! कुमारिकांना सद्बुद्धी दे !
स्त्री : का ?
पोपट : या जगात कुमारिकांना फार मोठी किंमत असते.
स्त्री : तुझ्या आजीची किंमत काय होती ?
पोपट : माझे आजोबा ब्रह्मचारी होते.
स्त्री : मग तुझे वडील कसे जन्मले ?
पोपट : पुरुष स्वतःच्या कर्तृत्वावर जन्मतो.
स्त्री : मग स्त्रीचा काय उपयोग ?
पोपट : स्वैंपाक–पाणी, उष्टं–खरकटं, निवडण–टिपण, धुणी–भांडी, केर–कचरा, पूजा–अर्चा !

स्त्री : बस्स ? एवढंच ?
पोपट : वेलची–लवंग, गादी–पलंग, रंग–ढंग !
स्त्री : बस्स ? एवढंच ?
पोपट : डोंगर–दऱ्या, दारं–खिडक्या, चढ–उतार...
स्त्री : आणि काय ?
पोपट : स्त्रीचे नाना उपयोग आहेत, स्त्री हा एक हरहुन्नरी पाळीव प्राणी आहे. आमच्या आजोबांनी तीन स्त्रिया पाळल्या होत्या. वडिलांनी दोन.
स्त्री : ( पायमोजा उंचावीत ) हे काय आहे ?
पोपट : ( बघतो, बघता बघता थरथरतो ) हे तर आमचे वडील ! नका, नका ! असे पाहू नका ! ( गुडघे टेकतो. ) हा तर परमेश्वर ! ( पुन्हा चमकून उठतो ) हा तर साक्षात पुरुष ! ( पुन्हा मटकन् बसतो. )
स्त्री : ( पायमोजा फेकून देते. पोपट तो पटकन् उचलून छातीशी कवटाळतो. ) याचा मला काहीच उपयोग नाही.
पोपट : ( उठून उभा राहत ) तू माझ्याशी लग्न करशील का ?
स्त्री : लग्न ? कशासाठी ?
पोपट : मी तुला पिंजऱ्यात ठेवीन. तिथं आपल्या मुलं होतील. मी तुला चारा घालीन. मुलांना दाणा-पाणी घालीन.
स्त्री : मी तुझ्याशी लग्न कशाला करावं ?
पोपट : ( गुडघे टेकून ) कारण माझं तुझ्यावर प्रेम आहे.
स्त्री : प्रेम कसं असतं ?
पोपट : प्रेम ब्लेडसारखं धारदार असतं. प्रेमाला साबणासारखा फेस येतो. प्रेम चहासारखं कढत असतं. प्रेम झाडूसारखं असतं. प्रेम गड्डूसारखं असतं. प्रेम पाट्या-वरवंट्यासारखं असतं. प्रेम फडताळासारखं असतं. प्रेम सुपा-सारखं असतं. प्रेम चाळणीसारखं असतं. प्रेम उखळीसारखं असतं. प्रेम किराणा मालाच्या दुकानासारखं असतं. प्रेम धोब्यासारखं असतं. प्रेम दूधवाल्यासारखं असतं. प्रेम पोस्टमनसारखं असतं.
स्त्री : पण प्रेमाचा उपयोग काय ?
पोपट : ( तिच्याभोवती फिरत ) प्रेमानं डोकेदुखी, सरदी–ताप, खोकला...सर्व नाहीसं होतं. प्रेमानं पचनशक्ती सुधारते. प्रेमानं पोट साफ राहतं. प्रेमानं झोप गाढ लागते. प्रेमानं कांती तजेलदार होते. प्रेमानं शरीर प्रमाणबद्ध राहतं.
स्त्री : ठीक आहे. आपण लग्न करू. ( पोपट थबकतो, आनंदाश्चर्याने बघत राहतो. ) पण आधी तू पिंजऱ्यात जा. ( पोपट पिंजऱ्यात जातो. )

[ स्त्री पिंजरा बंद करते. पोपटाच्या आसनावर जाऊन बसते. ]

स्त्री : मिठू मिठू पोपट
आहे मोठा चावट !
खातो डाळ कच्ची ! !
नि मलाच म्हणतो लुच्ची

पोपट : ( ओरडून ) धावा ! धावा ! काहीतरी चुकतंय् ! प्रचंड गफलत झालेली दिसते ! ( स्त्रीकडे बघून ) माझ्या आई, महामाये, बया, दार उघड ! बया, दार उघड ! ( स्त्री त्याच्याकडे येऊन त्याला मोकळा करते. तो पटकन् बाहू फडफडावतो. मग दोन्ही हातांच्या घड्या घालून तिच्याकडे बघत ) झाला खेळ ? आता जा पाहू स्वतःच्या पिंजऱ्यात ! हे वयाच्या नऊ-दहा वर्षापर्यंत ठीक आहे ! पुढं असलं काही चालत नाही ! यापुढं दुपारी इंग्रजी पुस्तकं वाचायचं बंद ! ( तिला बंद करतो. ती निश्चल उभी. पोपट आपल्या आसनावर जाऊन बसतो. )

[ अंधार. ]

## दृश्य नववे

[ पोपटऊर्फ पहिल्या दृश्यातला पुरुष १ आणि विदूषक : पुरुष २. पोपट आसनावर, विदूषक पिंजऱ्यात– स्त्रीऐवजी. ]

पोपट : ( आसनावरून उतरून, मजेत शीळ घालत, पिंजऱ्याकडे येतो. विदूषकाला पाहून स्तंभित होतो. भयंकर चिडून ) याचा अर्थ काय ?

विदूषक : याचा अर्थ उघड आहे. मी बंद आहे.

पोपट : कसा बंद ?

विदूषक : जसं मुंबई बंद. पुणं बंद. औरंगाबाद बंद. कोल्हापूर बंद. नागपूर बंद. महाराष्ट्र बंद. भारत बंद.

पोपट : बंद कर ही बकवास ! तू या पिंजऱ्यात कसा ?

विदूषक : ( पिंजऱ्याच्या गजांपुढे हात ओवाळत ) आज मी स्त्री–वेषात कसा ? ( भसाड्या आवाजात )
राकट देशा, कणखर देशा
स्त्रियांच्याही देशा ऽ

पोपट : ( कानांवर हात ठेवून ) हिजड्यासारखा गाऊ नकोस.

विदूषक : ( हिरमुसला होऊन ) मग कोणासारखा गाऊ ? (टायमिंग साधून ) लताबाई-सारखा ?

पोपट : षंढा ! मुकाट्यानं बाहेर ये.

विदूषक : ( व्याकूळपणे ) यातूनही बाहेरच येऊ ? ( गयावया करत ) निदान एवढा तरी थारा असू दे मला.

पोपट : ( त्याला मोकळा करून बाहेर ओढतो ) शूद्र ! ब्राह्मण ! क्षत्रिया ! वैश्या! तुला उत्खनन करून पुरला पाहिजे ! तुला मुख्यमंत्री करून काढला पाहिजे! एखाद्या किरट्या वयाच्या कुमारिकेशी तुझा विवाह लावून टाकला पाहिजे.

विदूषक : घात झाला ! घात झाला ! ( रडू लागतो )

पोपट : अरे, काय कुठं विमान उडालं ? बोट धक्क्याला लागली ? का एकदम वारा पडला ? आँ ? काय, झालं काय ?

विदूषक : ब्रह्मचर्यावस्थेत च्यवनप्राश खाल्ला ! बाल्यावस्थेतच मकरध्वज ! तरी पस्तावलो ! तरी पस्तावलो ! ( फटाफटा स्वतःलाच मारू लागतो. )

पोपट : अरे, ए, गप ! ( विदूषक स्तब्ध ) लग्नाची गोष्ट काढताच तू असा ढसाढसा रडायला काय लागतोस ? अरे, तुमच्यासारख्यांना लग्नं थोडीच टळतात ?

विदूषक : म्हणजे लग्न अटळ आहे ?

पोपट : अर्थात !

विदूषक : मग तू लग्नाशिवायचा कसा ? आणि इतका अनुभवी कसा ?

पोपट : सोपं आहे !

विदूषक : काय ?

पोपट : सगळं सोपं आहे.

विदूषक : मग ते जरा साधं करून सांग.

पोपट : कठिणं !

विदूषक : सगळं सोपं आहे ? मात्र ते साधं करून सांगणं कठिणं ? अरे बाबा, मी काही वाङ्मयाचा विद्यार्थी नाही, किंवा माझी लोणच्यापापडांतही हयात गेलेली नाही.

पोपट : तू मर्त्य आहेस, हे तरी तुला कबूल आहे का ? ( विदूषक रडतो, पोपट दरडावून ) थांबतोस, की नाही ? ( विदूषक मानेनेच हो म्हणतो. )

विदूषक : ( काही वेळाने ) थांबतो. थां ऽऽ ब ऽ लो.

पोपट : ( समजावणीच्या स्वरात ) आणखी एक कटु सत्य तुला स्वीकारणं भाग आहे.

विदूषक : ( खाकरतो. मग घाबरून, विनवणीच्या स्वरात ) सॉरी ! मी माझं मन घट्ट

करत होतो.

पोपट : सर्व काही घट्ट कर! निर्वाणीचा क्षण आलाय्! ऐक ते सत्य! ऐक : मी अमर आहे!

विदूषक : (त्याच्या पायांशी कोसळून पडत) काय? तूही अमर आहेस? (आकाशाकडे पाहत) परमेश्वरा! सगळे अमर तू भारतातच का जन्माला घालतोस?

पोपट : चालता हो इथून!

[अंधार]

## दृश्य दहावे

[पिंजऱ्यातील स्त्री नऊवारी लुगडे नेसलेली आहे. तिच्या नाकात नथ, मात्र तिच्या हातात एक चिरुटाची पेटी व लायटर आहे. पोपट तिच्या पिंजऱ्याचे दार उघडतो व न बोलता बाहेर येऊन ती चिरूट शिलगावते.]

पोपट : (चार पावलं मागे सरून) अहो, तुम्हांला नुकतंच स्वातंत्र्य मिळालंय्?

स्त्री १ : (चिरुटाचा झुरका घेऊन चिरूट तोंडातून बाहेर काढत) भारतीय परंपरेत स्त्री नेहमीच स्वतंत्र राहिली आहे.

[दुसरी स्त्री चुळबुळ करत राहते.]

पोपट : चुळबुळायला काय झालं!

स्त्री २ : वसंत ऋतू सुरू झाला का, हो?

पोपट : का? तू कोकिळांचा आवाज ऐकलास काय? (तिच्याकडे दुर्लक्ष करून) आता तुम्ही स्त्री राहिला नाहीत. पिंजऱ्याबाहेर स्त्री–पुरुषांत काहीच फरक नसतो.

स्त्री १ : वा! नसतो कसा? पिंजऱ्याबाहेर स्त्रीचं सामर्थ्य पुरुषापेक्षा जास्त असतं.

पोपट : पिंजऱ्याबाहेर स्त्री–पुरुषांत काहीच फरक नसतो!

स्त्री : अहोऽ?

पोपट : काय आहे?

स्त्री २ : तुम्हीच ते सुप्रसिद्ध पोपट ना?

पोपट : मीच तो. काय काम आहे तुझं?

स्त्री २ : माझ्या पिंजऱ्याचं दार उघडाल का?

पोपट : सर्वांच्या पिंजऱ्यांची दारं उघडण्याचा मी मक्ता थोडाच घेतलाय् ?

स्त्री २ : मी असं ऐकलंय्, की...

पोपट : साफ खोटं आहे ते. हा सर्व माझ्या विरोधकांचा दुष्ट प्रचार आहे. वर्तमान-पत्रांवर तुम्ही लोक अजूनही विश्वास तरी कसा ठेवता ? यात काही परकीय सत्तांचाही हात आहे.

स्त्री २ : मी असं ऐकलंय्, की...

पोपट : ऐकीव गोष्टी ! सगळ्या ऐकीव गोष्टी !

स्त्री १ : (पुन्हा चिरुटाचा झुरका घेऊन) तुम्हांला कालीमातेचा विसर पडला, वाटतं ?

पोपट : कोण कालीमाता ?

स्त्री १ : (पुन्हा चिरुटाचा झुरका घेते व चार–पाच फेऱ्या घालते. मग) तिनं गळ्यात पुरुषांच्या मुंडक्यांची माळ घातली होती.

पोपट : ही किती सालची गोष्ट आहे ?

स्त्री १ : (चिरुटाचा झुरका घेऊन) पौराणिक काळची. पण तुम्हांला निदान अहल्याबाई, आनंदीबाई, लक्ष्मीबाई ठाऊक असतील ?

पोपट : ही केव्हाची गोष्ट आहे ?

स्त्री : ऐतिहासिक काळातली. पण निदान तुम्ही इंदिरा गांधींचं नाव ऐकलं असेल ?

पोपट : ही केव्हाची गोष्ट आहे ?

स्त्री २ : पण....?

पोपट : (दरडावून) पण काय ? पण काय ? (रागाने थराथरा कापतो. मूठ वळून तिच्या पिंजऱ्याच्या दिशेने उगारतो) सगळं खोटं आहे ! भारतातल्या लोकांना सत्य सहन होईनासं झालंय्. (पड्यात डमरू. डमरू थांबल्यावर) मी समाजाला मसाज करतो. (डमरूचा आवाज. डमरू थांबल्यावर–) मी स्त्रियांचा साज उतरवतो. (डमरूचा आवाज.) मी पुरुषांचा माज उतरवतो. (डमरूचा आवाज.) मी संसाराचं ढोंग उघडं करतो. (डमरूचा आवाज) मी पतिव्रतांना पंख देतो. (डमरू वाजतो.) मी कुमारिकांचा शंख वाजवतो. (डमरू वाजतो.) मी कुटुंबनियोजनाला पाठिंबा देतो. (डमरू वाजतो.) मी शालेय शिक्षणातले दोष ओळखतो. (डमरूचा आवाज.) मी वेश्याव्यवसायाची निर्भर्त्सना करतो. (डमरूचा आवाज.) मी साहित्य संमेलनांना जात नाही. (डमरूचा आवाज.) मला कमिशन एजंट आवडत नाहीत. (डमरूचा आवाज.) मी...मी....मी...(त्याला शब्द फुटत नाही.)

स्त्री २ : शांत व्हा. शांत व्हा.

स्त्री १ : मुद्दा असा आहे, की पिंजऱ्याबाहेर स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त शक्तिशाली असतात.

पोपट : पिंजऱ्याबाहेर स्त्री–पुरुषांत काहीच फरक नसतो.

स्त्री १ : कोण म्हणतो नसतो ? वर्णव्यवस्थेबाहेर शूद्र ब्राह्मणांपेक्षा जास्त शक्तिशाली असतात. भांडवलदारी समाजाबाहेर मजूर भांडवलदारापेक्षा जास्त शक्तिशाली असतात. अमेरिकेबाहेर काळे लोक जास्त शक्तिशाली असतात. शिवाय जगात पुरुषांपेक्षा बायकांची संख्या जास्त आहे. समजा, बायका संपावर गेल्या, तर ?

पोपट : तर काय ? पुरुष स्वतःचं सगळं नीट करतील.

स्त्री १ : नीट करतील ? सगळं ?

पोपट : ( गडबडतो ) नाही...म्हणजे...काही काही बाबतींत स्त्रियांचा उपयोग आहेच पुरुषांना. पण...स्त्रियांचं पुरुषांशिवाय अडणार नाही !

स्त्री १ : अडेल ! अडेल ! कारण अखेर पुरुषच स्त्रियांचे प्रजाजन आहेत. बायकांच्या पोटी जन्म घ्यायला आणि व्यायला त्यांचा उपयोग आहेच.

पोपट : म्हणून तर मी म्हणतो...काय म्हणतो ? हं ! पिंजऱ्याबाहेर स्त्री–पुरुष सारखेच. ( थकलेल्या आवाजात ) आता माझा स्त्रियांवरही विश्वास उरलेला नाही.

स्त्री २ : जरा तेवढं दार उघडा ना, पोपट !

पोपट : कामातुराणां न भयं न लज्जा ! ( मोठ्याने ओरडून ) मी सेन्सॉर बोर्डाला पाठिंबा देतो. ( डमरूचा आवाज. ) यापुढं जगाचे सर्व व्यवहार पिंजऱ्यातच चालावेत, असं माझं मत आहे. ( डमरूचा आवाज. ) यापुढं जगातल्या सर्व बायकांना दक्षिण ध्रुवावर पाठवून दिलं पाहिजे, अशी माझी खात्री झालेली आहे. ( डमरूचा जोरदार आवाज. )

स्त्री २ : पोपट ! पोपट ! माझं तुमच्याकडे एक खाजगी काम आहे !

पोपट : मी हल्ली सार्वजनिक जीवनातून निवृत्त झालोय्.

स्त्री २ : माझं काम नाजूक आहे.

पोपट : असणारच. असणारच. प्रत्येक बाईचं काम सुरुवातीला नाजूकच नसतं का ?

स्त्री २ : दार उघडा ना.

पोपट : दार उघडू...

स्त्री २ : हो...प्लीऽज.

पोपट : नेव्हर !

स्त्री १ : तुमच्या सगळ्या कल्पना पुरुषी आहेत. स्वतंत्र विचार करण्याची तुमच्यांत ताकद नाही.

पोपट : जगातले सर्व तत्त्वज्ञ, मुत्सद्दी, महाकवी, कलावंत, पंडित, शास्त्रज्ञ, सेनापती पुरुष होते. (पड्यात डमरू.)

स्त्री १ : त्यात काय ? जगातले बहुतेक हमाल, शेतमजूर, कामगार, ड्रायव्हर, वेटर, पुरुष आहेत. (पड्यात डमरू.)

पोपट : जगातले सर्व बाप पुरुष आहेत.

स्त्री १ : जगातल्या सर्व आया स्त्रिया आहेत.

पोपट : जगातले सर्व ब्रह्मचारी पुरुष आहेत.

स्त्री १ : जगातल्या सर्व कुमारिका स्त्रिया आहेत.

पोपट : परमेश्वर पुरुष आहे.

स्त्री १ : परमेश्वराची आई आणि बायको स्त्री आहे. परमेश्वराची सासूसुद्धा स्त्रीच आहे. परमेश्वराची बहीण, परमेश्वराची मेव्हणी, परमेश्वराची काकी–मामी सर्व स्त्रिया आहेत. (पड्यात डमरू)

पोपट : एका श्रीकृष्णाला सोळा हजार आठ बायका होत्या.

स्त्री १ : एका द्रौपदीला पाच नवरे होते.

पोपट : बायका जनानखान्यात खुशीनं राहतात.

स्त्री १ : पुरुष बाईखातर नोकऱ्याचाकऱ्या करतात.

पोपट : बायका बाळंत होतात.

स्त्री १ : पुरुष तर बाळंतसुद्धा होत नाहीत. (पड्यात डमरू.)

पोपट : बायकांवर बलात्कार होऊ शकतो.

स्त्री १ : पुरुषांना षंढत्व येऊ शकतं.

पोपट : पुरुषांनाच बुद्धीची कामं झेपतात.

स्त्री १ : पण स्त्रियांनाच शरीराचं महत्त्व पण कळतं.

पोपट : स्त्रियांना नऊ महिने गर्भार राहावं लागतं.

स्त्री १ : पुरुषांना रोज वर्तमानपत्र वाचावं लागतं. (पड्यात डमरू.)

पोपट : स्त्रियांना जास्त कपडे लागतात.

स्त्री १ : पुरुषांना तंबाखूचं व्यसन जडतं.

पोपट : स्त्रियांना स्वयंपाक करावा लागतो.

स्त्री १ : पुरुषांना बॉसची थुंकी झेलावी लागते.

पोपट : स्त्रियांना एकनिष्ठ राहावं लागतं.

स्त्री १ : पुरुषांना व्यभिचार करावा लागतो. (पड्यात डमरू.)

पोपट : स्त्रिया शरीरविक्रय करतात.

स्त्री १ : पुरुष बुद्धिविक्रय करतात.

पोपट : पुरुष बुद्धिविक्रय करू शकतात, कारण त्यांच्याकडे बुद्धी असते.

स्त्री १ : स्त्रिया शरीरविक्रय करतात, कारण त्यांच्याकडे शरीर असतं. शिवाय बुद्धीपेक्षा शरीराला किंमत चांगली येते.

पोपट : स्त्रियांना पुरुष व्हावंसं वाटतं.

स्त्री १ : पुरुषांना पुरुषच राहावंसं वाटतं. ( पडद्यात डमरू. )

पोपट : ( दार उघडून ) घे ! घे भोग स्वातंत्र्य !

स्त्री २ : मला पुरुषाचा अनुभव नाही.

पोपट : दे टाळी ! मलासुद्धा पुरुषाचा अनुभव नाही !

स्त्री २ : तुम्ही जगातला शेवटचा पुरुष आहात, असं मी ऐकलंय्.

पोपट : खरी आहे ती गोष्ट. कारण ठाऊकाय् ! ( पडद्याकडे ओरडून ) अरे, हे पद सुरू करा ! पद सुरू करा !

[ पडद्यात पद सुरू होण्याऐवजी डमरू वाजायला लागतो. डमरू ऐकताच पोपट थिजल्यासारखा उभा.
स्त्री त्याच्या गळ्यात हात टाकते. ]

पोपट : काढ, सखे, गळ्यातले तुझे चांदण्याचे हात...

स्त्री २ : युगामागुनी चालली, रे, युगे ही...

पोपट : रहा तिथे तू, जिथे आपुल्या हृदयामधली काच तडकली...

स्त्री २ : पोपटपंची चतुर्की जान, पढो पार्वती शिरी भगवान् !

पोपट : ( संशयाने ) तुम्ही डॉक्टरेट करत आहात, हे ठाऊक असतं, तर आम्ही पिंजऱ्याचं दारच उघडलं नसतं. हा विश्वासघात आहे ! रोम्यांटिक कविता पाठ करून वर स्वतंत्र व्हायच्या गोष्टी करता ! त्यापेक्षा पावकी म्हणा. निमकी म्हणा. पाऊणकी म्हणा. दीडकी म्हणा. औटकी म्हणा.

स्त्री २ : मी तुम्हांला सोडणार नाही, पोपट. आपण जनम-जनमके साथी आहोत.

पोपट : साथीच्या रोगांचा मुळातच प्रतिबंध झाला पाहिजे. ( पडद्यात डमरू वाजतो. )

पोपट : तुम्ही अडाणी आहात.

स्त्री १ : तुम्ही पुरुष आहात.

पोपट : तुम्ही व्यापारी आहात.

स्त्री १ : तुम्ही गिऱ्हाईक आहात.

पोपट : तुम्हांला स्वाभिमान नाही.

स्त्री १ : तुम्हांला दंभ आहे.

स्त्री २ : मी तुमच्याशी एकनिष्ठ राहीन. शपथ! (त्याला पार्टिशनकडे खेचत नेऊ लागते. पोपट मटकन् खाली बसतो.) काय झालं?

पोपट : आता आणखी काय व्हायचं बाकी आहे?

स्त्री २ : तेच–जे अनादिकाळापासून होत आलेलं आहे.

पोपट : (हंबरडा फोडून) नको! नको! (पडद्यात डमरू.)

स्त्री २ (पोपटाला उठवून उभा करते. कमरेवर हात ठेवून त्याच्याकडे कौतुकानं टक लावून बघते) या वयातही तुम्ही कसे हिरवेगार दिसता!

पोपट : (कपाळाला हात लावून) ललाटीची करोरी फुटली. (डमरूचा आवाज.) भाषेच्या कानठळ्या बसल्या. (डमरूचा आवाज.) हिंदू धर्माचा नाश जवळ आला. (डमरूचा आवाज.) मी आता संन्यास घेईन, म्हणतो. (डमरूचा आवाज होऊन अचानक थांबतो.

स्त्री २ : आपण एकत्रच घेऊ या का संन्यास?

पोपट : संन्यास ही काही जोडीनं करायची गोष्ट नाही.

स्त्री २ : मग जे काय जोडीनं करता येईल, ते करू की!

पोपट : विसावं शतक पांगून चाललंय्.

स्त्री २ : मग आपण जोडीनं रांगू या!

पोपट : कुटुंबव्यवस्था धुळीला मिळालेय्.

स्त्री २ : मग आपण जोडीनं धुळीत लोळू या.

पोपट : (रागाने) माझ्याशी लगट करू नकोस! दूर हो! स्त्रीचा स्पर्शसुद्धा मला सहन होत नाही. स्त्रीची सावलीसुद्धा मला....

स्त्री २ : अंधारातच तर जायचंय्. सावलीचा थोडाच प्रश्न आहे तिथं?

पोपट : व्यभिचारी स्त्रिये, तुला लाज कशी वाटत नाही?

स्त्री २ : कसली लाज?

पोपट : (आसनावर जाऊन बसतो) तरी बरं, मला अगोदरच अढळपद मिळालंय्.

पोपट : तुमचं वय काय?

स्त्री १ : पन्नास.

पोपट : म्हणजे तुम्ही स्त्री नाही.

स्त्री १ : का?

पोपट : तुमचं स्त्रीत्व संपून गेलं.

स्त्री १ : तुमचा व्यवसाय काय?

पोपट : (छाती फुगवून) मी द्रष्टा आहे.

स्त्री १ : म्हणजे तुम्ही नेमकं काय करता?

पोपट : मी मनुष्यजातीला मार्गदर्शन करतो.
स्त्री १ : म्हणजे तुम्ही भोंदू आहात.
पोपट : मी भोंदूंचा मार्गदर्शक आहे.
स्त्री १ : म्हणजे मनुष्यजातच भोंदू आहे.
पोपट : त्याला माझा इलाज नाही.
स्त्री २ : ( त्याला पुन्हा पार्टिशनकडे खेचत नेताना ) आज मी मोक्ष मिळवणारच.
पोपट : कयामतचा दिवस जवळ येतोय्. ( डमरूचा आवाज. )
स्त्री २ : ( त्याला आत नेत ) आत तर चला ! आत तर चला ! ( पडद्यात ढोल. दिव्यांची उघडझाप. पडद्यात डमरू वाजून थांबतो. )
स्त्री १ : तुम्ही, म्हणे, स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करता !
पोपट : ( नर्व्हसपणे हसतो. ) हो.... तसंच काहीसं.
स्त्री १ : आजवर तुम्ही किती स्त्रियांना मुक्त केलंत ?
पोपट : असतील शंभरएक.
स्त्री १ : त्या कुठं आहेत ?
पोपट : त्यांतल्या काही गृहिणी आहेत, काही नोकरी करतात, काही प्राध्यापिका आहेत, काही स्वतंत्र व्यवसाय करतात, काही ..
स्त्री १ : बरेच दिसता की, हो !
पोपट : का ? काय झालं ?
स्त्री १ : ( चहाटळपणे ) नाही म्हणजे... बरेच दिसता !
पोपट : ( घाबरून आपल्या आसनाच्या दिशेने जाऊ लागतो. )
स्त्री १ ( विझलेला चिरूट शिलगावत ) त्या बायकाही मूर्ख असल्या पाहिजेत.
पोपट : मूर्ख ? अगोदर होत्या. नंतर शहाण्या झाल्या. मी त्यांना समानतेची जाणीव करून दिली... 'वासांसि जीर्णानि यथा विहाय...' हाय....हाय...हाय !

[ अडकलेल्या तबकडीप्रमाणे तोच-तोच शब्द उच्चारतो. कष्टाने थांबतो.]

स्त्री २ : ( हसत सुटते ) अय्या ! ( पोपट रागारागाने बाहेर येतो. त्याच्या हातांत दुर्बीण आहे. )
पोपट : ( दुर्बिणीतून प्रेक्षकांकडे बघत ) एकसुद्धा नाही. एकसुद्धा नाही !
स्त्री २ : ( बाहेर येत ) अहो पोपट !
पोपट ( घाईघाईने आसनाकडे जाऊ लागतो. स्त्री त्याला पार्टिशनमध्ये पुन्हा खेचून नेते. जाताजाता- ) आत चला ! आत चला ! काय लावलंय् हे

सतत !

स्त्री २ : महत्त्वाची गोष्ट राहूनच गेली.

पोपट : मग काय ? महत्त्वाच्या गोष्टी शतकानुशतक राहूनच गेल्यात...

स्त्री २ : उदाहरणार्थ ?

पोपट : उदाहरणार्थ, अजून सर्दीवर औषध सापडलेलं नाही.

स्त्री २ : आत चला, पाहू !

पोपट : मी निरीच्छ आहे.

स्त्री २ : मग एवढे आढेवेढे का घेता ?

पोपट : मला नवीन महाकाव्याच्या सुरुवातीच्या ओळी सुचताय्‌त. तुझ्याकडे बॉल-पेन्‌ आणि कागद्‌ आहे का ?

स्त्री २ : विषयांतर करू नका ! चला बरं आत !

पोपट : ज्याला विषयवासनाच नाही, तो विषयांतर का करील ? काय होता आपला विषय ?

स्त्री २ : तुम्ही मला मुक्त करणार आहात !

पोपट : कोणापासून ? मुक्त कशाला ? मोकाटच आहेस तू !

स्त्री १ : तुम्ही स्त्री आहात, की पुरुष ?

पोपट : मी पिंजऱ्याबाहेर आहे.

स्त्री १ : तुम्ही घोडा आहात, की झुरळ ?

पोपट : मी पिंजऱ्याबाहेर आहे.

स्त्री १ : तुम्ही बटाटा आहात, की रिस्टवॉच्‌ ?

पोपट : ( आसनाकडे जात ) मी पिंजऱ्याबाहेर आहे.

स्त्री १ : तुम्ही काळोख आहात, की कोशिंबीर ?

पोपट : ( आसनावर बसत ) मी मुक्त आहे.

स्त्री १ : म्हणजे तुम्ही काहीच नाही आहात ?

पोपट : तूर्त तरी मी काहीच नाही आहे.

स्त्री १ : मी कोण, असा तुम्हांला प्रश्न पडलेला नाही ?

पोपट : अजिबात नाही. हा प्रश्न फक्त गुलामांना पडतो.

स्त्री १ : गुलाम कोण असतं ?

पोपट : गुलाम समाजव्यवस्था सांभाळतात. जे तक्रार करत नाहीत. जे प्रश्न विचारत नाहीत.

स्त्री १ : तर मग तुम्हीसुद्धा गुलाम आहात. तुम्ही तक्रार करत नाही.

पोपट : मी विचार करतो.

स्त्री १ : विचार ही एक प्रकारची तक्रारच.

पोपट : मी प्रेम करतो.

स्त्री १ : प्रेम हा एक प्रकारचा प्रश्नच !

पोपट : मी काव्य करतो.

स्त्री १ : काव्य ही एक प्रकारची गुलामगिरीच !

पोपट : मी....

स्त्री २ : ( प्रेक्षकांना उद्देशून ) पाहा, हो, पाहा, ह्या हलकटानं पिंजऱ्याबाहेर काढून माझा कसा घात केला ! ( पोपटाकडे पाहून, भोकांड पसरून ) पो ऽ पट ! मी तुला अशी सोडणार नाही हं. सांगून ठेवते ! ( भोकांड पसरते. )

पोपट : (घाबरून) ए बये ! गप्प बस ! गप्प बस ! हे नाट्यशास्त्राला धरून नाही ! ( ती मुसमुसत राहते. ) हे सौंदर्यशास्त्रात बसत नाही. ( ती हुंदका देते. ) तुझी....

स्त्री २ : ( निश्चयी स्वरात, भावनाशून्यपणे, दूरात टक लावून ) पोपट !

पोपट : काय ?

स्त्री २ : ( मनगट पुढे करून ) माझ्या नाडीचे ठोके नीट पडतायत ना ?

पोपट : ( मनगट पकडून डोळे मिटतो ) अरेच्चा ! ( डोळे उघडतो. घाबरून तिच्या मनगटाला कान लावतो. तिच्याकडे भेदरून बघतो. ती निश्चल, निर्विकार. ) तुझी नाडी बंद पडलेय् ? बाप, रे !

स्त्री २ : ( त्याला पार्टिशनकडे ओढत ) म्हणूनच सांगते, आत चल !

[ पोपट व ती आत जातात. दिव्यांची उघडझाप. प्रथम कोणताच आवाज नाही. मग एखादा प्रचंड कारखाना सुरू झाल्यासारखा खडखडाट.
तो थांबताच स्त्रीचं हसणं. शांतता.
एका हातात खराटा आणि दुसऱ्या हातात टोपली घेऊन पोपट खच्ची झाल्यासारखा बाहेर येतो. आपल्या आसनावर जाऊन बसतो.
मग स्त्री हातातल्या कॉंपॅक्टच्या आरशात स्वतःचं तोंड बघत, गालावरून पफ् फिरवत बाहेर येऊन पुन्हा पिंजऱ्यात निश्चल उभी राहते. ]

( पद )

चल, सख्या, जाऊ पड्याआड ॥ ध्रु. ॥
तिथे न यांची नजर टोचते
मूठ झाकली बंद राहते
कुणाचीच मग नाही चाड ॥ १ ॥

[ अंधार. ]

स्त्री १ : इकडे या ! ताबडतोब ! !

पोपट : ( घाबरत ) हा आलोच ! ( उतरून दबकत–दबकत येतो. )

स्त्री १ : (जमिनीकडे बोट करून) तिथं पडा !

पोपट : ( उताणा पडतो. प्रेतासारखा ) काही तक्रार असेल, तर तू वर्तमानपत्रात पत्र लिही. (ती किंचाळते.) किंवा तू थंड पाण्यानं आंघोळ कर. ( ती हंबरडा फोडते. ) किंवा तू लस्सी पी. (ती थयाथया पाय आपटते.) किंवा तू वर्ध्याला जाऊन ये. ( ती कण्हू लागते. ) किंवा तू सोलापूर जिल्ह्यात जाऊन पाणी पी. ( ती किंचाळते.) किंवा तू पुण्यातल्या शिक्षणसंस्था...( ती हंबरडा फोडते ) किंवा तू महाराष्ट्रातल्या साखर कारखानदारांचे कटु अनुभव आठव. (ती धाय मोकलून रडू लागते. पडद्यात डमरू. डमरू सुरू होताच तिचे रडणे थांबते. मग डमरूसुद्धा थांबतो.) जाऊ द्या ! मला काय करायचंय् !

स्त्री १ : अहो, मी स्त्री आहे ! मला स्वतंत्र करा !

पोपट : तुमचं वय पन्नास आहे. पन्नाशीपुढं सर्वच स्वतंत्र होतात.

स्त्री १ : ( पार्टिशनकडे बोट दाखवत ) माझ्यावर प्रेम करा !

पोपट : तुमच्यावर प्रेम ? ( घाबरून ) तुम्हांला प्रेमाची जरूर नाही.

स्त्री १ : का !

पोपट : कारण तुम्ही चिरूट ओढता.

स्त्री १ : त्यामुळं काय होतं ?

पोपट : शिवाय तुम्ही नऊवारी नेसता. शिवाय तुमच्या नाकात नथ आहे.

स्त्री १ : याचं कारण मी आधुनिक आहे; पण मी आपल्या परंपरेचा त्याग केलेला नाही.

पोपट : या वयात प्रेम करणं झेपणार नाही.

स्त्री १ : की या वयात मी प्रेम केलेलं तुम्हांला झेपणार नाही ? (जोरात टाळी वाजवते.) या, ग, सगळ्याजणी ! (सर्वजणी पिंजरे उघडून बाहेर येतात. )

स्त्री २ : अय्या ! हा तर पोपट !

स्त्री ३ : पोपट मेला, की काय ?

स्त्री ४ : त्याची चोच थरथरतेय् !

स्त्री ५ : काढून घ्या त्याची चोच !

[ सर्वजणी मिळून पोपटाचे विदुषकी नाक खेचून वेगळे करतात. ]

स्त्री १ : (पोपटाचे नाक हातात उंच धरून, सर्वांना उद्देशून) मानवाच्या इतिहासातलं एक पर्व आज संपलं! आज स्त्री स्वतंत्र झाली! यापुढं ही चोच मंदिरात ठेवून तिची पूजा करण्यात येईल.

सर्व स्त्रिया : (कोरस)

मिठू मिठू पोपट
होता मोठा चावट
खाई कच्ची कैरी
मलाच म्हणे वैरी.

मिठू मिठू पोपट
पुरुष होता पक्का
आंब्याच्या मोसमात
लावायचा लग्गा।

मिठू मिठू पोपट
पुरुषाची जात
एक डोळा बाहेर
एक डोळा आत!

स्त्री १ : आजपासून पुरुष संपले!
सर्वजणी : तथा ऽ स्तु!

पद

(राग बहार : द्रुत तीनताल)

अर्ध मर्द पूर्ण सर्द पहुडला उताणा।
तोम् तननन। तननन।
तन तननम् तन देरेना
तन तननम् देरेना ॥ धृ. ॥

ना दिर दिर दिर दिर। दिर दिर दिर दिर देरेना।
सा सा नी नी ध ध। मम गग रेसा
सारेग रेगम। गमध मधनीसा
हा सपाट परमेश्वर। माझ्याशी बोलेना ॥ धृ ॥

[ ' अर्ध मर्द पूर्ण सर्द पहुडला उताणा ' हे बहार रागातलं पद आणि त्याचा तराणावजा अंतरा सर्वजणी पोपटभोवती फेर धरून नाचत–नाचत गातात आणि गाता–गाता, नाचत–नाचत विंगमध्ये निघून जातात.

रंगभूमीवर एकटाच पोपट निश्चल आणि उताणा पडला आहे. दृश्य आणि दृश्याबरोबरच नाटकही संपतं. ]

प ड दा

---

टीप : जास्तीची पदं अधेमधे टाकण्यासाठी, लेखकानं हातची राखून ठेवलेली आहेत.

# सुतक

२३३४८ १५।४।५८
नाटक

## अंक पहिला

[ पडदा उघडतो, तेव्हा स्टेजवर तीन पांढऱ्या भिंती आणि मध्यावर प्रेक्षकांकडे पाठ करून स्टुलावर एक काळ्या पोशाखातील तरुण स्त्री बसलेली असते. स्टेजच्या उजव्या हाताला प्रेक्षकांकडे तोंड करून एक रिकामा सोफा. स्त्री खाली मान घालून, निश्चल.

टेपरेकॉर्डरवर मनुष्य नुकताच मेल्यानंतर होणारी ठरावीक मराठी रडारड, मराठी हुंदके, मराठी सांत्वन, मराठी कळवळा, इत्यादी पुरेशी मळमळ आणि शोकात्म वातावरण उत्पन्न होईपर्यंत–म्हणजे सुमारे तीन मिनिटे. हा भाग विषयाची स्पष्ट सूचना देणारा असल्यामुळे महत्त्वाचा आहे. काही वाक्ये : ' कसं, ग, बिचारीचं होईल आता ! नुक्तंच लग्न झालं होतं. नवा ब्लॉक पण कसा मिळाला होता ! ' ' आई ग ! अशी पाळी कोणावरच येऊ नाही ! ', ' कसे, हो, त्याचे डोळे दिसत होते ! हिनं बघून जी किंकाळी फोडली ! रामा ! मला तर शब्दच फुटेना ! ', ' बेशुद्ध झाली, ग, किंकाळी फोडून ! ', ' उठली, ती हुंदके देतच. ' मला मारून टाका ! मलासुद्धा मारून टाका ! ' म्हणत होती ! बघवत नव्हतं ! ', ' फार प्रेम होतं, हो ! आजकालच्या दिवसांत पाहायलासुद्धा मिळत नाही ! ', ' स्वतःच मंगळसूत्र तोडून टाकलं बांगड्या काढून टाकल्या, कुंकू पुसलं ... ', ' आणि नेताना कसला हंबरडा फोडलाय् , म्हणून सांगू ! माझ्या तर जिवाचं पाणीपाणी झालं ! शेवटी मी आणि ह्यांनी घट्ट धरून ठेवलं ! ' वगैरे. हे आवाज अत्यंत स्पष्ट हवेत. जणू काय ते स्टेजवरच उच्चारलेले आहेत.

थोडा वेळ शांतता.

नंतर टेपरेकॉर्डरवर विधवा झालेल्या स्त्रीचीच किंकाळी, हुंदके, रडारड, हंबरडा वगैरे. पुन्हा सामसूम.

अचानक स्टेजवर समारंभाला जाण्याच्या पोशाखात दोन पुरुष व दोन स्त्रिया येतात. ही मंडळी येऊन कोचावर बसतात. तरुण विधवेकडे बघत आपसांत बोलतात.

एका पुरुषाच्या हातांत पुष्पगुच्छ व दुसऱ्याकडे फ्लॅशगन व कॅमेरा आहे. स्त्रियांच्या हातांत पेन्सिली आणि टिपणवह्या. कॅमेरावाला ऊर्फ पुरुष क्रमांक १ सोफ्यावरून उठून वेगवेगळ्या अँगल्सनी विधवेकडे बघतो. स्टेजवरच्या नाना कोपऱ्यांमधून कॅमेऱ्यातून तिच्याकडे बघतो. शेवटी एकदम झटक्याप्रमाणे हालचाल करत ' क्लिक ' करतो, फ्लॅशचा प्रकाश ! ]

पुरुष १ : स्प्लेंडिड ! वा ! होल्ड ऑन प्लीज ! हलू नका. काय भाव आहेत चेहऱ्यावर ! हनुवटी तशीच ठेवा !

[ विधवा जरा हलते. कॅमेरावाला कपाळावर हात मारतो. ]

पुरुष १ : ओ, नो ! तसं नाही ! ( तो जवळ जातो. तिची हनुवटी जरा वळवतो. ) हां, आता अशाच राहा ! फक्त एकच मिनिट ! अशी संधी परत येणार नाही ! ( मागे जाऊन 'क्लिक' करतो. पुन्हा फ्लॅशचा प्रकाश ! )

स्त्री १ : ( सोफ्यावर बसल्या बसल्या ) अहो, एवढी कसली घाई झालेय् तुम्हांला ! आल्बमभरून फोटो मिळतील ! जरा थांबा की, अजून ती गोंधळलेली दिसतेय्. तिला निश्चित कल्पना तर येऊ द्या !

पुरुष १ : ( सोफ्याकडे येऊन बसत ) मला फक्त एक सुरुवातीचं पिक्चर हवं होतं. नंतर तुलनेला उपयोगी पडेल.

पुरुष २ : ( प्रेक्षकांकडे बघत ) काही लोकांना वर्षानुवर्ष प्रसंगाचं गांभीर्य कळत नाही ( घसा साफ करतो. ) आताचंच पाहा ना ! या स्त्रीला दुःख म्हणजे काय, याची कल्पनासुद्धा नाही ! पाहा, कशी मख्ख दिसते ! असंस्कृत ! हिच्या जागी तुम्ही आम्ही असतो, तर ? ( स्त्री क्रमांक २ कडे वळून ) तुम्हांला काय वाटतं ? योग्य वातावरण उत्पन्न व्हायला किती वेळ लागेल ! ( घड्याळाकडे बघत ) वेळ नुसताच चाललाय् ! ( स्त्री क्रमांक २ कडे बघून ) सुरुवात करू या ?

[ ती होकारार्थी खूण करते. तो गुच्छ सरसावत उठतो आणि विधवेसमोर जाऊन उभा राहतो, जरा लवतो, पुन्हा घसा साफ करतो. काही वेळ तसाच उभा राहतो. सोफ्यावर परत येऊन बसतो. ]

पुरुष २ : मला वाटतं, ती अजून गोंधळलेलीच आहे ! थोडा वेळ झक मारून थांबायलाच हवं !

स्त्री १ : ( हिचा आवाज ऑल इंडिया रेडिओवरल्या स्त्री-अनाउन्सर्ससारखा उगाचच मधाळ आहे : म्हणजे हवामानाच्या बातम्या देताना प्रियाराधनाचा स्वर लावल्याप्रमाणे. ) ज्या नवऱ्यावर तिचं अत्यंत उत्कट प्रेम होतं, तो मरून आता वीस तास लोटलेले आहेत.

स्त्री २ : ( जाड आवाज : प्रियाराधनाच्या वेळीही हवामानाच्या बातम्या सांगितल्याप्रमाणे. ) हे बघा ! तुम्ही सगळंच गृहीत धरून चालताय् ! अजून त्या

नवऱ्यावर तिचं उत्कट प्रेम होतं, असं कशावरून म्हणता येईल? ही तर मठ्ठासारखी बसून आहे! दुःख तरी करता येतंय् का? या गोष्टी जन्मतःच येत नाहीत काही! वेळ लागतो! कष्ट करावे लागतात!

पुरुष २ : (घसा साफ करून) आशा सोडू नका! धीर धरा! अजून वातावरण तयार व्हायचंय्! कशावरून...? (थोडा थांबतो. घसा साफ करतो.) कोणी सांगावं? तिच्या नवऱ्यावर तिचं अजूनदेखील प्रेम बसू शकेल. उत्कट! दिसामासांनी वाढत जाईल! (घसा साफ करून) तो मरून गेला, म्हणून काय झालं? खरं तर प्रेम करायला सुरुवात करायला हीच योग्य संधी आहे! आशा सोडू नका!

पुरुष १ : (कॅमेऱ्याशी चाळा करत) हिचा तो नवरा! वीस तासांपूर्वी मरून गेलेला! अजिबात फोटोजिनिक नव्हता! कुठूनही पाहा—बावळट! मेल्यावरसुद्धा चेहऱ्यावर चांगलं एक्सप्रेशन ठेवून गेला नाही!

स्त्री १ : तिचं त्याच्यावर उत्कट प्रेम होतं!

पुरुष १ : (उठून, कॅमेऱ्यासकट विधवेच्या पाठीशी उभा राहून) त्याला नाकसुद्धा नीट शिंकरता येत नसे!

स्त्री १ : (उत्कट, उत्साही स्वरात) असं प्रेम सहसा बघायला मिळत नाही!

पुरुष १ : (नाजूक स्वरात, हळुवार) बोलताना त्याची थुंकी उडायची!

स्त्री १ : (उत्कटपणे : जणू स्वतःचेच प्रेम) तिनं त्याचा विचार केला नाही, असा एक क्षणही कधी गेला नाही!

पुरुष १ : (अत्यंत समजूतदार आवाजात) त्याच्या तोंडाला घाण यायची!

स्त्री १ : (नाजूकपणाचा पल्ला वाढवीत) कितीदा तरी तो झोपलेला असताना ती तासन् तास त्याच्या चेहऱ्याकडं पाहाऽत बसायची. (खोल श्वास घेऊन) त्याला ऑफिसातून यायला उशीर झाला, तर ती गॅलरीत जाऊन उभी राहायची. (आणखी खोल श्वास घेऊन) तो नसला, तर जेवणाचा एक घासही तिला घेववत नसे. (उसासा टाकून) इतक्या उत्कट प्रेमावर दैवानं अवेळी घाव घालावा? सगळ्याच सुंदर गोष्टींचा असा अकल्पित नाश का होतो? का होतो? (अत्यंत नाटकी, भावविवश मुद्रेने प्रेक्षकांकडे बघत राहते.)

पुरुष १ : (भावविवश स्वरातच) आंघोळ करण्याचा त्याला भयंकर कंटाळा. तोंड सतत तेलकट दिसायचं. आणि भयंकरच आळशी होता. तोंडावर माशी बसली, तर माशी हलल्याशिवाय हा हलायचाच नाही. तसंच फार कामचुकार. खरं तर अगदी तुमच्या-आमच्यासारखा होता. म्हणजे नोकरी करायचा, भाजी आणायचा, पेपर वाचायचा, नाटकं—सिनेमे पाहायचा,

गाडीनं प्रवास करायचा, राजकारणाची चर्चा करायचा. पण एकूण इतका बावळट आणि कामचुकार, की आपल्याला मळमळच वाटेल. (विचारपूर्वक) कोणाही सर्वसामान्य स्त्रीनं त्याच्याशी अगदी सुखानं संसार केला असता. (थांबून) बायकोच्या मुठीत राहायचा, तिला भ्यायचा. (थांबून) विशेषतः रात्र झाली की! (नाजूकपणे हसत) तशी तिला तक्रार करायला जागाच नव्हती! तिच्या प्रत्येक मैत्रिणीचा नवरा तसाच! भयंकर पापभीरु! (थांबून) रात्री ऽऽऽ.... (थांबतो.) त्याला आपल्या मर्यादांची जाणीव होती. (थांबतो.) आपल्या तोंडाला घाण येते, हे तो ओळखून होता. (थांबतो.) आपण बुटके, काळे, हडकुळे, घामट आणि बावळट आहोत, हे त्याला ठाऊक होतं. (शीळ घालतो.) त्यामुळंच तो संसारसुखाला पात्र ठरला. (थांबून) प्रियकर व्हायला अगदी योग्य इसम होता. (थांबून) गुंड, मवाली, थिल्लर, पोशाखी हीरो नव्हता काही तो! (शीळ घालतो.) आपल्यांतलाच एक!

स्त्री १ : (काव्यमय स्वरात) केवढं उत्कट प्रेम!

पुरुष १ : आणि अंगाला घाण!

स्त्री १ : केवढं तरल प्रेम!

पुरुष १ : आणि थुंकी!

स्त्री १ : केवढं भव्य प्रेम!

पुरुष १ : आणि किती बुटका माणूस!

स्त्री १ : पण ते स्वप्न विरून गेलं!

पुरुष १ : बसचा धक्का लागला!

पुरुष २ : (घसा साफ करतो. बाकीचे स्तब्ध होतात.) अजून योग्य वातावरण तयार झालेलं नाही. संस्कार आणि अभ्यास यांच्याखेरीज माणसांना शोक होतच नाही. आणि शोक हा असा असतो, की तो झाला, म्हणजेच केलेला दिसतो. शोकांचा आशय आणि शोकाची अभिव्यक्ती यांत अद्वैत आहे. (त्याचा सूर प्राध्यापकासारखा आहे.) कुत्रं नुसतं केकाटतं, त्याला शोक करता येत नाही. पण शेक्सपिअर? कोणीही प्रतिभावंत घ्या! शोक माणसानं शोधून काढला, वाढवला. त्यानं आपली प्रतिभा पणाला लावून शोकाची लांबी, रुंदी, खोली वाढवली! प्रचंड, विश्वव्यापी शोक फक्त माणसालाच करता येतो! त्याच्यावर एक मोठी जबाबदारी असते! आविष्काराच्या मर्यादा वाढवणं! त्या इतक्या वाढल्या पाहिजेत, की ज्या गोष्टीच्या निमित्तानं शोक झाला, ती शोकाच्या प्रखर तेजात, त्याच्या अनिर्बंध प्रवाहात अदृश्य झाली पाहिजे. (थांबतो. घसा साफ करतो.) या बाईचा नवरा

वारला. पण आपल्याला कोणती सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे, याची तिला अजून जाणीवही नाही ! ( थांबतो. ) ती अजूनही शोक कशी करत नाही ? ( थांबतो. ) जमेल हळूहळू. पाण्यात पडलं, की पोहायला येतं. ( थांबतो. ) आपण आशा सोडली न पाहिजे ! आताचंच पाहा ना ! हिनंसुद्धा थोडी प्रगती दाखवली, नाही असं नाही ! प्रथम नुसतीच किंचाळून बेशुद्ध झाली. ( जरा थांबून ) मग शुद्धीवर येताच हंबरडा फोडला. ( जरा थांबून ) मग ओक्साबोक्शी रडायला लागली. ( जरा थांबून ) मग कोरडेच हुंदके देत राहिली. अन् मग.. ( एक सूचक विराम घेऊन ) तिला पहिला शब्द फुटला ! ( थांबून ) शब्दाचं वाक्य झालं ! ! ( थांबून ) पाच वाक्यं बोलली !

स्त्री २ : ( जाड, रूक्ष, टीकेच्या सुरात ) एवढा शोक कोणीही करील ! चार तासांत निदान दोन-तीन प्याराग्राफ हवे होते ! अस्खलितपणे शोक करता यायला हवा ! नाहीतर माणुसकीला अर्थ काय ? कष्ट घेतल्याशिवाय जमायचं नाही ! नवरे काय, वारतातच ! माझाही वारला ! वीस वर्षं झाली ! पण मी शोक करायला शिकले, की नाही ? एकदा शोक करायला सुरुवात केली, की जीवनात केवढा मोठा अर्थ सापडतो ! जसा शोक वाढवावा, तसा काही तरी निर्माण केल्याचा आनंद वाढत जातो ! आज मी चोवीस तास–अहोरात्र–शोका-विषयी बोलू शकते ! नवरा मरून वीस वर्षं झाली ! पण कशी लक्षावधी वर्षं लोटल्यासारखी वाटतात ! पण हा शोक ! कसा तरुण ! उफाड्याचा ! बांड !

पुरुष १ : ( किंचित उपहासाच्या स्वरात ) मुळात नालायक असलेल्या माणसाबद्दल शोक तरी काय करणार ? कसा करणार ? ( विराम. ) तो फालतू होता. ( विराम. ) एक सर्वसामान्य माणूस ( विराम. ) मुर्दाड. ( विराम. ) चारचौघांसारखाच दुबळा, मूर्ख, बावळट आणि घृणास्पद. ( विराम. ) कितीही प्रेम असलं, तरी तोंडाला घाण येणाऱ्या, गंजीफ्रॉकाला घामाचा दर्प येणाऱ्या माणसाचं सहजासहजी चुंबन घेता येतं का ? ( विराम. ) मग असा माणूस मेल्यावर शोक तरी कसा सहज करता येणार ? ( विराम. ) मुळात हिला तो कधीच आवडत नसणार. ( विराम. ) कर्तव्य म्हणून हिनं त्याच्यावर प्रेम केलं असेल. ( विराम. ) असं सगळेच लोक करतात. ( विराम. ) तसा रिवाजच आहे. ( विराम. ) परंपराच तशी आहे. ( विराम. ) आदर्श हीरो–हिरॉईन प्रेम करतात, अमुक अमुक साबण वापरून आपली त्वचा मुलायम आणि कांती नितळ झाल्याचं हसतहसत कबूल करतात. ( स्वल्पविराम. ) तसं बाकीचे सर्व प्रेम करतात, साबणही तोच वापरायला कमी करत नाहीत. ( विराम. ) या गोष्टी खऱ्या शोकाच्या आड येणारच. त्यात नवल कसलं ?

स्त्री १ : ( रोमँटिक, मधाळ स्वरात ) : प्रेम आंधळं असेल, बहिरं असेल, मुकं असेल, पांगळं असेल, बधिर असेल...पण त्या दोघांचं एकमेकांवर फार फार प्रेम होतं....

पुरुष २ : ( पुष्पगुच्छ सावरत उभा राहून मोठ्याने खाकरतो. ) अध्यक्षमहाराज... ( इकडे तिकडे बघून ) सॉरी ! ( थोडा वेळ थांबून, घसा साफ करून ) बंधुभगिनींनो...( इकडे तिकडे बघून मान हलवतो. ) छे : ! सॉरी ! ( घसा साफ करून अस्खलित पण गंभीर आवाजात ) अजून प्रसंगाचं गांभीर्य स्पष्ट झालेलं नाही ! ( पुष्पगुच्छ छातीशी धरून, समजावणीच्या स्वरात ) आपण सगळेच वेळप्रसंगी शोक करतो. ( विराम. ) फार काय, आपण सतत शोक करत असतो. ( विराम. ) दुःख कोणी मुद्दाम भोगायला तयार नाही. म्हणून आपल्या सुखालाही अर्थ नाही. व्यथा आम्हांला त्याज्य वाटते, ( विराम. ) असं एका प्रतिभावंतानं म्हटलेलं आहे. ( विराम. ) तो पुढं म्हणतो, की सर्व मानवी समाज भौतिक राहणी उंचावयाचा विडा उचलून बसलेले आहेत. ( विराम. ) आणि निरोगी, दुःखरहित प्रजेचे डोहाळे सर्वांना लागलेले. ( विराम. ) दुःखाला सामोरे जाण्याची कोणाची तयारी नाही. ( विराम. ) दुःख करायला हिंमत लागते, हिकमत लागते. ( विराम. ) दुःख करायला प्रतिभा लागते. ( विराम. ) पण लोकांना दुःखाचं भय वाटतं. ( विराम. ) हे चूक आहे. साफ चूक आहे. कारण, दुःखाइतकी सहज उपलब्ध होणारी गोष्ट दुसरी कोणतीच नाही. ( विराम. ) वाटेल त्या निमित्तानं दुःख करता येतं. ( विराम. ) ती एक कला आहे. ( तंद्री लागल्याप्रमाणे ) शोककला ! कलेचा अत्युच्च आविष्कार ! रडता–रडता रडण्याशी इतकं तन्मय व्हावं, की रडण्याचं कारणही त्यात विरघळून जावं ! उरावं फक्त अस्खलित रडणं ! रूपरसगंधस्वादशब्दमय शोक ! शोक म्हणजेच परमेश्वर ! रसो वै सः ! यांतला रस म्हणजे शोकरस ! ज्यानं एकदा शोकाची चव घेतली आहे, त्याला दुसरी कोणतीही चव भुरळ पाडू शकत नाही. ( भानावर आल्याप्रमाणे, घड्याळाकडे बघत ) हे काय चाललंय् ! काही वेळ आपण सर्वच गप्प राहू. तिच्याकडं पाहत राहू. पाहू या, काय होतंय् , ते ! ( खाली बसतो. गप्प राहण्याचा इतरांना इशारा करतो. )

[ आता चौघेही पाहुणे कोचावर बसलेले आहेत. ते निश्चल आहेत.
विधवा मध्ये स्टुलावर निश्चल बसलेली आहे.
हळूहळू इतर दिवे मंद होऊन कोचावरील मंडळींच्या फक्त धूसर आकृत्या

दिसतात.
विधवेवर एक स्पॉटलाइट पडतो. त्यात, हळूहळू ती वळून प्रेक्षकांकडे तोंड करताना दिसते. प्रेक्षकांकडे संपूर्ण वळून ती पुन्हा निश्चल बसते.
सुमारे दोन मिनिटे अवघडल्यासारखी शांतता.
मग फटकन स्पॉटलाइट माल्वला जातो. स्टेजवर सुमारे एक मिनिटपर्यंत अंधार. नंतर जो स्पॉटलाइट पडतो, तो विधवेचे स्टूल आणि कोच यांच्या मधोमध रिकाम्या जागेत. आणि आता स्त्री क्रमांक १ चा मधाळ, रोमँटिक आवाज, हिप्नॉटिस्टने समजावणीच्या स्वरात भुरळ घालावी, तसा ऐकू येतो. ]

स्त्री १ : ( हळुवार, संथ, मधाळ, आर्जवी स्वरात ) तुला दुःख झालंय् , होय ना ? ( शांतता. ) तुला फार फार दुःख झालंय्. ( शांतता. ) दुःख तुझ्या इतकं जवळ आहे, की ते तुला दिसतच नाही. ( शांतता. ) जा ना ! त्याला सामोरी जा ! ( शांतता. ) तुझं स्वतःचंच दुःख आहे ते. ( शांतता. ) परकं नाही. ( शांतता. ) किती प्रांजल आणि उत्कट आहे तुझं दुःख ! ( शांतता. ) किती कोमल आणि मधुर आहे तुझं दुःख ! ( शांतता. ) जा ! तू तुझ्या दुःखाच्या मिठीत जा ! ( शांतता. ) मग त्याचा चेहरा बघ ! त्याच्या डोळ्यांत डोळे मिळव. त्याचं चुंबन घे ! ( शांतता. ) त्याच्याशी बोल. ( शांतता. ) प्रेम करताना कशी बोलायचीस, तशी बोल ! ( शांतता. ) बघ, तुला नक्की शब्द फुटेल. ( शांतता. ) असं प्रियाराधन तू कधीच केलेलं नसशील. ( शांतता. ) ए ! ( शांतता. ) बघ, बघ ! तुझं दुःख किती आतुरतेनं तुझ्याजवळ उभं आहे ! ( शांतता. )

[ अचानक स्टेजवर सर्वत्र लख्ख प्रकाश.
विधवा डोळे झाकून पुन्हा निश्चल बसते.
पुरुष क्रमांक १ कॅमेऱ्यासकट उठतो. विंगच्या दिशेने चार पावले जाऊन उभा राहतो आणि इतरांकडे बघून उद्वेगाने हात हालवतो, खांदे उडवतो.]

पुरुष १ : ( वैतागून ) यात काही अर्थ नाही. मला वाटलंच होतं, असं होणार ! या बाईला दुःख झालेलं नाही. होणं शक्य नाही. आपला वेळ नुसता फुकट चाललाय् ! यापेक्षा करमणूक बरी ! इथं काहीच होत नाही ! एक बाई आणि आपण चौघं असूनही काही नाही ! ( विराम. ) इकडून निघून गेलेलं बरं ! मला फक्त चार-पाच फोटो मिळाले. तेही सुरुवातीचे.

त्यांत एक्स्प्रेशन म्हणून फारसं काही नाहीच. ( विराम. ) चला, आपण जाऊ या ! या बाईला अजिबात दुःख झालेलं नाही, होण्याचा कधी संभव नाही. तिला शोक करता येणं शक्य नाही ! ( विराम. ) एक तर ही त्याला विसरू शकत नाही. आणि त्याला आठवल्यावर त्याच्याबद्दल शोक तरी काय करता येणार ? फालतू माणूस होता ! तिला हे पक्कं ठाऊक आहे. खरं तर तिला सुटका झाल्यासारखं वाटतंय् ! जायचं का ? मी म्हणतो, इथून आता गेलेलंच बरं ! आपण जाताच हिचे नेहमीचे व्यवहार सुरू होतील ! आपण आहोत, म्हणून ही अशी मुखस्तंभासारखी बसलेय् ! कारण, आपल्याला शोक झालाय् , हे भासवायचा ती प्रयत्न करतेय्. गप्प राहून ! ती आपल्या डोळ्यांत धूळ फेकतेय् ! चला ! बास झालं !

[ जाऊ लागतो. ]

पुरुष २ : ( अधिकारी स्वरात ) एक मिनिट ! एवढ्यावर हे सोडून देता येत नाही.

[ पुरुष क्रमांक १ थांबतो. ]

पुरुष २ : आपण आपलं कर्तव्य पार पाडलं पाहिजे ! आणि त्यासाठी जरा धीर धरला पाहिजे. इकडं येऊन बसा, पाहू !

[ पुरुष क्रमांक १ परत येऊन बसतो. ]

स्त्री २ : ( कठोर, अधिकारी स्वरात ) हे पाहा, असं फार वेळ चालणार नाही ! शोक ही एक सामाजिक कृती आहे, याचा तुम्हांला विसर कसा पडला ? ( थांबून ) तिला आपल्या अस्तित्वाची आपण जाणीव करून दिली पाहिजे. ( एकेक शब्दावर जोर देत, विधवेकडे बघत ) पाळीपाळीनं तिच्याकडे जा. तिच्याशी बोला. सर्व उपाय करून पाहा. अखेर ती किती वेळ अशी एकटी, गप्प बसून राहील ? तिचा रेझिस्टन्स तोडला पाहिजे ! चला, सुरुवात करा. आपापल्या पद्धतीनं प्रथम तिला बोलती करा.

स्त्री १ : ( जरा चुळबुळत ) मी ?

स्त्री २ : ( रूक्ष स्वरात ) चालेल ! पण फार वेळ मिळणार नाही ! नीट विचारपूर्वक, नेमकी मात्रा शोधून काढली पाहिजे !

स्त्री १ : ( कोचावरून उठून विधवेकडे जाते आणि तिच्या खांद्यावर हात ठेवते.

मग स्टुलाच्या पायाशी बसून, विधवेचा हात धरून थोपटत ) ए! अशी किती वेळ बसून राहणार तू ? दुःख झालंय् न तुला ? मला सांग न ? मला नाही का सांगणार ? बोल न !

[ विधवा तशीच निश्चल आहे. ]

स्त्री १ : तो गेला ! तुला कायमचा सोडून गेला ! आता त्याच्या सहवासातल्या मधुर क्षणांची आठवण तेवढी शिल्लक आहे ! बोल न ! बोल ! तू किती हळवी आहेस, हे मला ठाऊक आहे. माझ्याजवळ आपलं मन हल्कं कर न ! बोल ! ( उठून विधवेच्या पाठीशी उभी राहते. तिच्या गळ्यात हात टाकून ) दुःख सर्वांनाच भोगावं लागतं, ग ! पण प्रत्येकाच्या दुःखाला आगळं व्यक्तिमत्त्व असतं ! तुझ्या दुःखाचं सौंदर्य असं लपवून ठेवू नकोस ! बोल ! बोल न ! ( गळ्यातून हात काढून घेते आणि विधवेची पाठ थोपटते. ) बघ ! या सगळ्यांना तुझं दुःख कळून घेण्याविषयी केवढी उत्कंठा वाटतेय् ! बोल ! त्यांना दिपवून टाक तुझ्या दुःखानं ! ( विराम. ) तुला त्याच्यापासून मूलसुद्धा झालं नाही ! ( विराम. ) पण तो तुला केवढं सुंदर दुःख देऊन गेला ! ( विराम. ) आता तू तेच वाढवलं पाहिजेस ! मोठं केलं पाहिजेस ! नावारूपाला आणलं पाहिजेस ! तुमच्या दोघांच्या संगमातून काहीच जन्मलं नाही. पण वियोगातून हे दुःख फळलं ! आता ते पोटात ठेवू नकोस ! त्याला जन्म दे ! आई व्हावंसं वाटत नाही तुला ? जगातल्या सर्वांत सुंदर दुःखाची आई ! बोल न ! बोल !

[ विधवा तशीच निश्चल.
पुरुष क्रमांक १ कोचावरून उठून उभा राहून दोघींचा एक फोटो काढतो. स्टेजवर फ्लॅशचा प्रकाश. त्याला एकदम अनावर हसू लोटते. ते काही केल्या आवरतच नाही. हसता हसता तो आपली जागा बदलतो आहे. मधेच हसणे थांबवून फोटो घेतो आहे. हिस्टेरिकल, अनावर हसू त्याला येत राहते. आणि मधेच शांत होऊन, नेम धरून तो फोटो काढतो. पुन्हा पुन्हा फ्लॅशचा प्रकाश. अनेकदा प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर फ्लॅश.
फ्लॅशगनमध्ये बल्ब वापरले पाहिजेत. ते फुटल्याचा आवाज आला पाहिजे. इलेक्ट्रॉनिक फ्लॅशगन चालणार नाही.
अखेर पाच–सहा वेळा फ्लॅशने फोटो काढण्यावर तो विधवेच्या आणि स्त्री क्रमांक १ च्या अगदी जवळ येऊन उभा राहतो. त्याचे तोंड प्रेक्षकांकडे

आहे. पुन्हा एकदा तो जोरजोरात हसतो. हसता हसता खिशातून रुमाल काढून तोंड पुसतो. मग एकदम शांत होतो. ]

पुरुष १ : शोकाचा फोटो काढणं सोपं नाही! करेक्ट पोझ घेतल्याशिवाय शोक करताच येत नाही! तरी पण...(जरा थांबून) तरी पण योग्य अँगल, लायटिंगकडं लक्ष दिलं, तर काहीतरी करता येतं! त्यासाठी एक्सपोझर अचूक हवं; लेन्स किती उघडी ठेवायची, याचा अंदाज हवा; फोकसबाहेर काय टाकायचं आणि शार्प फोकसमध्ये काय घ्यायचं, ते ठरवता यायला हवं. मुख्य म्हणजे चौकटीत चित्राची मांडणी नीट करता यायला हवी! शोक परिणामकारक दिसला पाहिजे! तो अचूक व्हिज्वलाईझ करता आला पाहिजे. असं वाटलं पाहिजे, की इट्स देअर. काय? (स्त्री क्रमांक १ कडे वळून) तुम्हांला जमलं नाही. सेंटिमेंटल ॲप्रोच उपयोगाचा नाहीच. मी आता हे काम हातात घेतो. तुम्ही बसा! दमला असाल!

[ स्त्री क्रमांक १ कोचावर जाऊन बसते. ]

पुरुष १ : तर हां, मी काय म्हणत होतो? (विधवेकडे बघून) तुम्ही फक्त मी सांगतो, तशी पोझ घ्या! एकदा शोकाची पोझ जमली, की मग तुमचा शोक तुम्हांलाच आवरणार नाही! भराभर आपणहून पोझेस् द्याल! (विधवेच्या जवळ जाऊन तिची हनुवटी वर उचलतो, चेहरा स्टेजच्या टोकाकडे वळवतो.) हां! अशाच स्थिर राहा! एकटक शून्यात पाहत राहा. शून्यात! शून्य दिसत नाही? नाहीच दिसत! त्याच्याकडं फक्त बघायचं असतं! एकटक! दॅट्स राइट! (बाजूला सरकतो, कॅमेऱ्यातून तिच्याकडे बघत बघत मागे मागे सरकतो.) हलू नका! इटस् कमिंग! येतोय्, येतोय् शोक तुमच्या चेहऱ्यावर! (अचानक थबकतो.) आता अगदी स्थिर राहा! ब्यूऽऽटीफुल वा! (क्लिक करतो.)

[ यानंतर स्टेजवर शांतता आहे.
विधवा दिलेल्या पोझमध्ये निश्चल आहे.
पुरुष क्रमांक १ आपले हात एकमेकांवर चोळत उभा आहे. मध्येच कसली तरी शंका आल्यासारखा तो निश्चल होतो. स्टेजच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत जातो. डोके खाजवत उभा राहतो. मग विधवेकडे बघत बघत, कॅमेरा डोळ्याला लावून, अगदी जपून तिच्या स्टुलाला प्रदक्षिणा घालतो.

प्रदक्षिणा घालताना त्याचा चेहरा सतत तिच्या चेहऱ्याकडेच वळलेला राहतो. प्रदक्षिणा पुरी होते. तो पुन्हा तिच्याजवळ येतो. गुडघे टेकून बसतो. ]

पुरुष १ : ( प्रथमच त्याचा स्वर थोडा आर्जवी झालेला आहे. ) असं काय करता ? इकडं पाहा ना ! माझं म्हणणं ऐका ! फोटोग्राफर झाला, तरी तो माणूस आहे ! तुम्ही अजिबातच सहकार्य दिलं नाहीत, तर तो तरी काय करणार ? नाही म्हणायला डार्करूममध्ये प्रिंट घेताना थोडा छायाप्रकाश वाढवता येईल. फोटोला उठाव देता येईल. पण एवढंच. तुम्ही तो मेलेला नवरा विसरा आता. तुमच्या स्वतःच्या चेहऱ्याचा विचार करा ! मी तुमचा चेहरा अमर करू शकेन ! तुम्ही तुमचा शोक अमर करू शकाल ! थोडंसंच सहकार्य द्या ! प्लीऽज !

[ विधवा निश्चल आहे. तो तसाच गुडघ्यावर. ]

पुरुष २ : ( घसा साफ करतो. ) चुकलं ! तुमचंही चुकलं ! मनुष्य हा बुद्धिजीवी प्राणी आहे. त्याला फक्त नीतीचं प्रलोभन दाखवता येतं ! जागेवर येऊन बसा ! मलाच हे काम उरकावं लागेल.

[ तो उठतो. पुरुष क्रमांक १ कोचावर येऊन बसतो.
पुरुष क्रमांक २ विधवेजवळ येऊन उभा राहतो. पुष्पगुच्छ त्याच्याच हातांत आहे. किंचित लवून, प्राध्यापकी सुरात तो आपले भाषण सुरू करतो. ]

पुरुष २ : ( घसा साफ करून, गंभीर, संथ, अर्धवट खाजगी स्वरात ) तुम्ही अजून अननुभवी आहात. अनुभवावाचून दु;ख नाही. दुःखाविना शोक नाही. शोकरस अगाध आहे, अपरिमित आहे, अलौकिक आहे ! ( थांबून ) शोकरसामुळं माणसाला आनंद का होतो ? ( थांबून ) या कूटप्रश्नाचं उत्तर फारच थोड्या लोकांना ठाऊक आहे ! ( थांबून ) शोकामुळं मोक्ष लाभतो, वस्तूच्या खोड्यातून आपली सुटका होते. ( विराम. ) तुमचा नवरा एक वस्तूच होता. खुर्चीसारखा, टेबलासारखा, चादरीसारखा, चहाच्या किटलीसारखा. आणि वस्तू नाशवंत असतात, हे आपल्याला ठाऊकच आहे. त्या सतत धरून ठेवता येत नाहीत. कारण, एक तर त्या वस्तू नाशवंत

असतात आणि दुसरं म्हणजे त्या धरून ठेवणारा आपला हात नाशवंत असतो. ( विराम ) वस्तू नाशवंत असतात. प्रियकर ही एक वस्तूच आहे. म्हणून प्रियकर नाशवंतच असतो. ( विराम. ) पण शोक ही वस्तू आहे का ? नीट विचार करा ! नाही ! शोक ही वस्तू नाही. ती एक जाणीव आहे. आणि जाणीव, वस्तू नष्ट होतात, तशी नष्ट होत नाही. तुम्ही असेपर्यंत ती असते. ( विराम. ) पण जाणिवेचा सतत आविष्कार करत राहिलं पाहिजे. नाहीतर ती बदलून जाईल ! ( विराम. ) यासाठी संस्कृती आहे, कला आहे ! ( विराम. ) जाणिवेचा आविष्कार होत राहावा, ती टिकावी, अजरामर व्हावी, म्हणून आपण विधी रचले ! शोक व्यक्त करणाऱ्या विधींना केवढं सौंदर्य असतं ! केवढा अर्थ असतो ! शोकाची निमित्तं नामशेष होतात, पण शोकाची स्मारकं मात्र अजरामर होतात ! ( घसा साफ करून ) ताजमहाल हे तर नेहमीचं उदाहरण झालं. तरी पण ते चालेल ! ( थांबून ) किंवा शोकात्म नाटकं ! ( थांबून ) गप्प राहण्यापेक्षा ढसाढसा रडत राहणं हे जास्त सुसंस्कृतपणाचं लक्षण आहे ( थांबून ) पण ढसाढसा रडण्यापेक्षाही शोकाला श्लोकाचं रूप देणं जास्त सुसंस्कृतपणाचं लक्षण आहे. वाल्मीकीनं काय केलं ? तसंच ! ( घसा साफ करतो. ) तुम्ही शोकाचा विचार करा, मग तुम्हांलाच हे कळून येईल. जखम झाल्यावर प्राणीसुद्धा विव्हळतात. पण स्वतःला अजिबात जखम होऊ न देता विव्हळण्याची प्रतिभा फक्त मानवात आहे ! ( खाजगी स्वरात ) माझंच पाहा ना ! एकोणीसशे त्रेपन्न साली मला दारुण शोकाचा पहिला अनुभव आला. आमच्या कॉलेजात माझ्या विषयाचा विभागप्रमुख मी व्हायला हवा होतो. पण भलत्याच माणसाची वर्णी लागली ! पंधरा वर्षं मी ज्यासाठी अहोरात्र झटलो, ते झालं नाही ! मला भयंकर फटका बसला; पण मग मला शोकाचं खरं स्वरूप कळून आलं ! तेव्हापासून कोणत्याही दुःखानं माझं हृदय सहज द्रवतं ! अगदी दोन हजार वर्षांपूर्वीच्या माणसांची दुःखंही माझ्या हृदयाला भिडतात ! भावी पिढ्यांचं दुःखही मला कळू शकतं, जाणवतं ! ( घसा साफ करून ) शोकाची जाणीव ही मानवतावादाची खरी सुरुवात होय! ( विराम. ) बुद्धाचं उदाहरण घ्या ! 'ता' वरून ताकभात ओळखावा, तसं जगातलं अपरिमित दुःख नुसती चार दृश्यं पाहून त्याला जाणवलं ! दुःख फक्त प्रतीकांद्वारां कळू शकतं, ते असं ! प्रतीकांद्वारांच त्याचं अरूप, अगाध, विश्वात्मक स्वरूप कळू शकतं. म्हणून भाषा वापरली पाहिजे. शब्दांद्वारा शोक निर्माण केला पाहिजे. इतका शोक, की तो मानवजातीला अखंड पुरेल. ( थांबून ) शोक हे आपलं कर्तव्य आहे. ( थांबून ) किंबहुना,

आपल्या आवडत्या गोष्टी नश्वर आहेत, यातूनच विरंगुळा उत्पन्न करायला आपण स्फूर्ती घेतली पाहिजे ! ( थांबून ) यातच शोकाचं मूळ रहस्य आहे. ( थांबून ) आपली आवडती वस्तू किंवा मनुष्य नष्ट झालं, तरी त्याचा रस आपल्याला सतत घेता यावा, म्हणून आपण शोक शोधून काढला ! किंबहुना, वस्तू आणि माणसं नष्ट होऊनही आपल्याला सतत रिझवतात. जीवन हे एक शोकात्म नाट्य आहे, आणि शोकात्मरसापासून जो अपूर्व आनंद मिळतो, तोच त्यातून मिळत राहतो ! ( विराम. गुच्छ सावरून धरत ) मी आपलं हे सारांशरूपानं तुम्हांला सांगितलं. पण मुख्य मुद्दा तुमच्या ध्यानात आलाच असेल ! तुम्ही सुशिक्षित आहात, सुसंस्कृत आहात. असं गप्प राहून कसं चालेल ? शोक व्यक्त करा. तो फैलावत जाईल. त्यातून तुमच्या अदम्य जीवनेच्छेला रंगरूप येईल. तुमचा नवरा मेला, ही गोष्ट फारच वाईट झाली. पण त्यामुळं जे नुकसान झालं, ते जन्मभर आवर्जून स्पष्ट करत राहणं हे तुमचं कर्तव्य आहे. ( धापा टाकतो. स्त्री क्रमांक १ कडे वळून ) मला जरा पाणी देता का ? इथं पाणी मिळेल का ?

[ ती मान हलवते. ]

स्त्री २ : बरं ! राहलं ! ( उसासा टाकतो. ) हा पुष्पगुच्छ ( विधवेपुढे पुष्पगुच्छ धरतो. ) आम्ही तुमच्यासाठी आणला आहे. ( विराम. ) तुम्ही यशस्वीपणे शोकाला सुरुवात करताच आम्ही समाजातर्फे तुमचं अभिनंदन करणार आहोत ! पाहा ! यात कशी तऱ्हेतऱ्हेची फुलं आहेत ! शोकाचा रंग, शोकाचा गंध असाच विविध असतो ! तुम्ही फक्त एक वाक्य म्हणा. साध्या, सरळ मराठीत एक वाक्य ! पुढचं आपोआप जमेल ! ( चुळबुळत थांबतो. प्रेक्षकांकडे पाहून खांदे उडवतो. ) मला शोक याचाच होतो, की तुम्हांला शोक करण्याची स्फूर्ती मी देऊ शकलेलो नाही. ( खेदाने मान हलवतो. ) ही एक मोठी नैतिक समस्या आहे, सदसद्विवेकबुद्धीची, मानवतेची, संवेदनाक्षमतेची, प्रगल्भतेची, बुद्धीची, सर्जनशील प्रतिभेची—इथं कसोटी आहे ! ( थांबतो. ) ही निर्णायक वेळ आहे ! बघा ! वेळ नुस्ताच चाललाय् ! एवढ्या सर्व लोकांची तुम्ही निराशा करणार ? त्यांना शोकरसातल्या अनुभवाचा आनंद देणार नाही ? इतक्या तुम्ही कोत्या, स्वार्थी, आणि आपलपोट्या आहात ? छेः छेः ! तुमचं चुकतंय् ! तुमची फार मोठी चूक होतेय् ! विचार करा ! याहून जास्त मी तरी काय सांगणार !

[ विधवा निश्चलच आहे.
पुरुष क्रमांक २ हताशपणे हातातल्या पुष्पगुच्छाकडे मान खाली घालून बघत राहतो.
अवघडलेली शांतता. ]

स्त्री २ : ( रूक्ष, कठोर, निर्णायक स्वरात ) झालं ? तुम्हांला जमणं शक्यच नव्हतं ! परत येऊन बसा, पाहू ! शोकरसावर एवढं कीर्तन केलंत, पण हिचं मात्र हूं नाही की चूं नाही ! ही बथ्थड आहे ! तिच्यावर चांगले संस्कारच झालेले नाहीत ! तुमच्याच्यानं व्हायचं नाही ते ! याला एकच उपाय आहे ! अगदी जुना, साधा, वडिलोपार्जित उपाय ! बावळटासारखे उभे काय राहिलात ? मागं येऊन आपल्या जागेवर बसा, पाहू !

[ पुरुष क्रमांक २ जरा चुळबुळतच परत येऊन कोचावर बसतो.
त्याच वेळी स्त्री क्रमांक २ उठते आणि सेनापतीच्या थाटात, आपल्या पर्ससकट, धीम्या पावलांनी विधवेसमोर जाऊन उभी राहते. ]

स्त्री २ : फार लाड झाले तुझे ! ( एकदम दरडावून ) हात पुढं कर !

[ विधवा यंत्राप्रमाणे हात पुढे करते. ]

तळहात पूर्ण उघड !

[ विधवा तळहात उघडते. ]

आता तुला मीच वठणीवर आणते !

[ या वेळी इतर दिवे मालवले जातात. विधवेवर आणि स्त्री क्रमांक २ वर प्रखर स्पॉट्स. स्त्री क्रमांक २ आपली पर्स उघडून तिच्यातून आपला चश्मा आणि फूटपट्टी काढते. पर्स खाली ठेवते. चश्मा डोळ्यांना लावते. फूटपट्टी हातात घेऊन कुरवाळते. विधवेचा हात पसरलेला, निश्चल. ]

स्त्री २ : टेंगशेबाई म्हणायच्या, छडी लागे छमछम, विद्या येई घमघम ! विधवा होत्या! केवढ्या कडक ! तरी पण केवढ्या सहृदय ! शोकरस सहज उत्पन्न करू

शकायच्या! कोणत्या वेळी, कोणती भावना उत्पन्न करावी, हे त्यांनी आम्हांला शिकवलं! त्या गेल्या, तेव्हा त्यांच्या दुखवट्याची सभा सहा तास चालली! मी अध्यक्ष होते! माझं भाषणच तीन तास चाललं! (भानावर येत, दरडावून) तुला दुःख होत नाही, अं?

[फाडकन विधवेच्या हातावर पट्टी मारते. विधवा निश्चल आहे.]

स्त्री २ : लागलं नाही ना हाताला? मी हळुवारपणेच मारली होती पट्टी! की लागलं? झिणझिण्या आल्या? हात हुळहुळा झाला? बाई ग, नवरा मेल्याचं दुःख याहून अधिक असतं! इतक्या वर्षांनंतर अजूनही मी ते अनुभवतेच आहे! लागलं नाही तुला? (खोट्या, कोमल स्वरात) नाही लागलं? (अचानक त्वेषाने सपकन फटका मारते.) नाही ना लागलं? दुःखाचं असंच असतं! आपली कातडी जाड! ते लवकर आत पोचत नाही आणि बाहेरही येत नाही! काय, ग? हात दुखतोय् का? नाही ना? नाहीच दुखायचा! (पुन्हा अचानक त्वेषाने पट्टी मारते.) शोकाची सुरुवात रडण्यात आहे. आणि रडण्याची सुरुवात अत्यंत क्षुद्र वेदनेत. पट्टी लागते, हे जेव्हा कबूल करता येतं, तेव्हा मग दुःख होतं, हे कबूल करणं सोपं जातं! काय, ग? अजून तुला जाणवलंही नसेल! नाही दुखत ना?

[त्वेषाने सपासप पट्टीचे फटके मारत राहते. मधेच थांबून प्रेक्षकांकडे दृष्टिक्षेप टाकते. पुन्हा सपासप फटके मारते.
अखेर विधवा एकदम विव्हळते. जोरात विव्हळून हुंदका देते. मग एकदम हुंदक्यावर हुंदके देते.
स्टेजवर सर्वत्र प्रकाश.
स्त्री २ विजयी मुद्रेने कोचावरील मंडळींकडे बघत राहते.
पुरुष १ उठून भराभर फोटो घेऊ लागतो.]

स्त्री १ : (आनंदून, मधुर स्वरात) झालं! तिचं दुःख सुरू झालं!
पुरुष २ : (घसा साफ करून) तथास्तु! आता खरी सुरुवात झालीय्! पाहू या, पुढं काय होतंय्, ते!

[विधवेने दोन्ही हात एकावर एक गच्च आवळले आहेत. तिचे रडणे आता स्पष्ट ऐकू येते.]

प ड दा

[ पडदा वर जातो, तेव्हा पहिल्या अंकातल्या सेटिंगमध्ये काही ठळक फेरफार दिसतात. रंगमंचाच्या मध्यावर एक पलंग आहे. त्यावर गादी, चादर, पांघरूण आहे. उशाशी स्टूल. स्टुलावर तांब्या, भांडे. तसेच पार्श्वभागी एक फुलदाणी आणि तिच्यात फुले. विधवा पलंगाच्या कडेशी बसलेली आहे. प्रकाश फक्त तिच्यावर, पलंगावर, स्टुलावर आणि पार्श्वभागीच्य फुलदाणीवर.

मात्र रंगमंचावर उजव्या बाजूला पहिल्या अंकातला कोच तसाच आहे, व उरलेली चारही पात्रे विधवेकडे टक लावून तेथे बसलेली आहेत. त्यांच्यावर प्रकाश नाही, पण त्यांचे अस्तित्व जाणवते. ]

विधवा : ( अस्खलितपणे ) कुठं गेला माझा शोक ? कुठं गेलं माझं दुःख ? कसं प्रचंड होतं ! कुठं हरवलं ? ( अडखळते. एकदम हुंदके देऊ लागते. ) नाही जमायचं मला ! मी खरंच सांगते, मला शोक करता येत नाही, हो !

स्त्री २ : ( जाड आवाजात, जरा दरडावूनच ) नाही होत शोक ? असा सुरुवातीपासूनच कोणाला झालाय् ? प्रयत्न करा ! प्रयत्न केल्याशिवाय शोकच काय, आनंदसुद्धा होत नाही ! चला ! अशा टिपं काय गाळता ? हातपाय गाळून काय बसता ? शोक करा की !

स्त्री १ : ( आपल्या असंबद्ध मधुर स्वरात ) तुमचं दुःख किती सुंदर आहे ! किती उत्कट आहे ! मला तर, बाई, हेवा वाटतो तुमचा !

स्त्री २ : (जाड आवाजात) शोक असा सहजासहजी करता येत नाही ! शोधा तुमचं दुःख ! जाऊन जाऊन कुठं जाणार आहे ते ? एवढीशी तर जागा आहे ! जरा नीट बघा !

[ विधवा पलंगावरून उठून उभी राहते. हलकेच पलंगाला प्रदक्षिणा घालत असतानाच— ]

पुरुष १ : ( हळुवार स्वरात ) स्त्रीचं दुःख पलंगाच्या अवतीभोवतीच सापडणार ! ( विराम.) हिचा नवरा इथंच झोपायचा. ( विराम. ) हे तर उघड आहे, म्हणा ! (विराम.) आता तो पलंगावर नाही. ( विराम. ) पण उशीच्या अभ्याला खोबरेलाचा वास येतोय् . ( विराम. ) तो डोक्याला खोबरेल लावायचा !

[ प्रदक्षिणा घालताना विधवा थांबते. एकदम उशी उचलून कवटाळून धरते. ]

विधवा : ( आनंदातिशयाने ) सापडलं! सापडलं! माझं दुःख सापडलं!

स्त्री २ : काय सापडलं? आनंद कसला झालाय् तुम्हांला?

पुरुष १ : खोबरेलाचा वास येतोय् का, हो?

विधवा : ( पुन्हा मटकन पलंगावर बसते. उशीचे चुंबन घेते. तिचा वास घेते. ) त्याच्या केसांना हाच वास यायचा! ( हळुवारपणे ) मी त्याच्या केसांवरून हात फिरवायची. आणि....

पुरुष १ : खोबरेलला तोच वास येतो थोड्याफार फरकानं! वाण्याच्या दुकानातसुद्धा! इतक्या सहज तुम्हांला तुमचं दुःख सापडत असेल, तर सकाळी लोकलनं प्रवास करा रोज! दहांतल्या नऊजणांच्या डोक्याला तुमच्याच उत्कट दुःखाचा वास येतो!

स्त्री १ : ती त्याच्या केसांवरून रोज हात फिरवायची. ( अत्यंत स्वप्नाळूपणे ) तिच्या हातात प्रेम ओथंबून आलेलं असायचं...

पुरुष १ : प्रेम? प्रेम नव्हे, खोबरेल!

स्त्री २ : जरा गप्प बसा तुम्ही! ती प्रयत्न करतेय्!

विधवा : ( संशयाने उशीकडे पाहते. उशी पलंगावर टाकून ताडकन् उभी राहते. ) नाही, माझं दुःख इथं नाही. ( पांघरूण उचलून त्याखाली बघते. ) इथंही नाही! ( हुंदका देते. भांड्यात पाणी ओतून घटाघटा पिते. मला भयंकर तहान लागलीय्. ( मोठ्याने ओरडून ) मला भयंकर तहान लागलीय्! ( विराम. ) मला दुःख सापडत कसं नाही? ( विराम. ) मी शोक कसा करू? ( रडू लागते. ) आतापर्यंत मी कधीच शोक केलेला नाही! शोक कसा करतात? मला कोणीतरी सांगेल का? शोक कसा करतात? ( पलंगावर मटकन बसते. ) आठवलं पाहिजे! आठवलं पाहिजे! ( विराम. ) माझं त्याच्यावर प्रेम होतं! ( क्षीणपणे ) खरंच, माझं त्याच्यावर प्रेम होतं! ( विराम. ) ह्या पलंगाची शप्पत! ( विराम. ) पण मी असं ह्यापूर्वी कधीच म्हटलेलं नाही. ! ( एकदम ओरडून ) तुम्ही हा क्रूर खेळ थांबवत का नाही? मला असं दुःख सापडणार नाही सर्वांसमोर! तुम्हांला स्वतःचं दुःख काहीच नाही का? निदान घरदार तरी स्वतःचं आहे ना? ( क्षीणपणे ) माझं शिक्षण फारसं झालेलं नाही. ( विराम. ) मी पुस्तकं वाचलेली नाहीत. ( विराम आठवून ) हो, पण मी दुःख पाहिलंय्! नाटकात, सिनेमात, सर्वत्र! ( विराम. ) माणसाला दुःख झालंच पाहिजे. ( विराम. हताशपणे ) पण

मला दुःखच होत नाही!

पुरुष २ : (घसा खाकरून) हाच तो सर्जनाचा क्षण! इथून खरं तर दुःख व्हायला हरकत नाही. फक्त हिनं तग धरली पाहिजे.

स्त्री १ : आपल्याला शोक करता येत नाही, याचं दुःख! हे तर केवढं भीषण! माझ्या तर अंगावर काटा येतो!

पुरुष १ : हे तर सर्वांनाच होतं. दुःख करणं काही सोपं नाही. (विराम.) दुःख करावं लागतं! ती एक क्रिएटिव्ह गोष्ट आहे!

स्त्री २ : वेल सेड! वेल सेड!

पुरुष १ : त्या घाणेरड्या दिवंगत नवऱ्याला विसरून जरी ही विशुद्ध शोकात रमून जाईल, तरच काही आशा आहे! (विराम.) पण तो घाणेरडा होता, हे तिला विसरता येत नाही. (विराम.) त्यामुळं शोकाला मर्यादा पडतात. (विराम.) तिनं त्याला यापुढं हीरो बनवलं पाहिजे! म्हणजे तो नव्हता, तसा!

स्त्री २ : हे मात्र चुकलं तुमचं! तो चांगला असता, तरी तिच्या शोकाला मर्यादा पडल्याच असत्या! शोक म्हणजे शोक! त्याचा कोणत्याच नश्वर गोष्टीशी संबंध नको! (विराम.) शोक ही एक स्वतंत्र, मुक्त सृष्टी आहे. (विराम.) माझाही नवरा मेला. (विराम.) खूप वर्षं झाली. (विराम.) खरं तर, तो कसा होता, हेही मला आठवत नाही! (विराम.) पण मी कसा शोक करू शकते, हे तुम्ही सर्वांनीच पाहिलंय्! (विराम.) ते पाहून सर्वांनाच शोक होतो. शोक युनिव्हर्सल आहे!

पुरुष १ : सॉरी! (विराम.) माझं चुकलंच! (विराम.) शोकाची भाषा, शोकाचा अभिनय– हे सर्व युनिव्हर्सलच आहे!

पुरुष २ : (घसा खाकरून) थांबा! (विधवेकडे बोट करून) ती सुरुवात करतेय्, वाटतं...

विधवा : (पलंगावर पडते.) मला वाटतं, मलाही शोक होतोय्! (विराम.) कसं पिसासारखं हलकं हलकं वाटतंय्! (विराम.) मला काहीच दिसत नाही! (विराम.) काहीच सुचत नाही! (विराम. पुटपुटते) शोक... शोक... शोक. (विराम.) कित्ती सुंदर शब्द! (विराम. हळुवारपणे) शोक.... शो... क... शोक... (विराम.) केवढी जादू आहे या शब्दात! (विराम.) शोकाची पहिली रात्र! (विराम.) लाज वाटते, बाई! (विराम.) शोक मला स्पर्श करतोय् हळूच! (विराम.) शोक माझी हनुवटी उचलून माझं चुंबन घेतोय्! (विराम.) शोक हळुवार हातांनी माझी वस्त्रं उतरवतोय! (विराम.) केवढा पुरुषी आणि तरी केवढा हळुवार असतो शोक. (विराम.) तो असा

नव्हता ! (विराम.) तो पुरुषीसुद्धा नव्हता अन् हळुवारही नव्हता ! (विराम) शोकाइतकी घट्ट मिठी त्याला घालताच येत नव्हती ! ( अचानक घाबरते. ) हे मला काय होतंय् ? ( उठून बसते. ) नाही, शोकाला मी स्पर्श करू देणार नाही. (अंग आक्रसून उभी राहते.) शोकाचा आणि माझा काय संबंध ? ( विराम.) ही अनैतिक गोष्ट आहे. ( विराम.) छीः ! शोकाबरोबर ? ह्याच पांघरुणात ? सर्वांसमोर ?

स्त्री १ : ( मधुर स्वराला मत्सराची झालर ) मला तर हिचा हेवा वाटतो ! एकटीच शोक करतेय् ! अगदी एकटी ! मनसोक्त !

स्त्री २ : हिचं पुन्हा चुकलं ! नवरा मेलाय् ! तो परत यायचा नाही ! पण शोक कोणीच हिरावून घेऊ शकत नाही ! ( विराम.) अडाणीच आहे !

पुरुष १ : पहिल्यांदा प्रेमात पडताना असंच व्हायचं ! ( विराम. ) शोकाबरोबरची ही हिची पहिलीच रात्र आहे ! (विराम ) शृंगार माफकच होणार !

पुरुष २ : ( घसा खाकरून) मला वाटतं, काहीतरी घडणार आता तरी !

विधवा : ( पलंगापासून दूर उभी राहते. ) मी आता विधवा आहे ! अनाथ ! एकटी ! मला फार जपून राह्यलं पाहिजे ! ( विराम. ) शोकापासूनसुद्धा ! ( विराम. ) त्यानं मला एकांतात एकटीला गाठलं, तर ? ( विराम.) तर मी काय करू ? ( असहायपणे ) तो मला काहीही करू शकतो ! शोकाइतकी ताकद माझ्यात नाही ! ( विराम. ) तो एकदम अंगावर आला, तर ! ( विराम. ) किंवा तो मला फुसलावण्याचा प्रयत्न करील ! ( विराम. ) कसलं तरी आमिष दाखवील !

स्त्री २ : समाजात उजळ माथ्यानं वावरायचं असेल, तर शोक करायला शिकलंच पाहिजे ! ( कुत्सितपणे ) काही लोकांना लवकर अक्कल येत नाही !

विधवा : ( फुलदाणीजवळ जाऊन फुलांकडे बघत ) ही फुलदाणी अशीच इथं आहे. ( श्वास टाकते. ) आमचं लग्न झालं, त्या पहिल्या रात्रीही अशीच होती. ( विराम. ) पण फुलं मात्र रोज बदलावी लागतात. (विराम.) आता यापुढं प्लॅस्टिकचीच ठेवलेली बरी. ( विराम ) अगदी खऱ्या फुलांसारखी दिसतात. (विराम.) शिवाय पाणीसुद्धा भरावं लागत नाही (विराम.) तो तर नेहमीच म्हणायचा, रोज रोज नवी फुलं कशाला, त्यापेक्षा एकदाच प्लॅस्टिकची का आणत नाहीस ? तर मी एकदा त्याला थट्टेत म्हटलं, ( विराम. ) की प्लॅस्टिकची फुलं कोमेजत नाहीत. जी फुलं कोमेजत नाहीत, त्यांचा काय उपयोग ? ( विराम. ) तसंच... ( थांबते. भेदरून ) अग, आई, ग ! काय बोलत होते मी !

पुरुष १ : ( उत्साहाने ) अगदी बरोबर बोलत होतात ! जो नवरा मरत नाही, त्याचा

काय उपयोग ?

विधवा : ( ओरडून ) नाही ! असं नाही म्हणायचं मला ! ( डोकं गच्च दाबून धरते. ) मला काय होतंय् ? ही माणसं आहेत तरी कोण ? यांनी माझ्या डोक्यात काय भरवून दिलंय् ? माझ्या डोक्यात नुसता गोंधळ झालाय् !

स्त्री १ : ( मधुर, मैत्रीच्या स्वरात ) दुःखानं असंच होतं माणसाचं. एक प्रकारचा डिव्हाइन मॅडनेस् येतो. बरं-वाईट, उचित-अनुचित, सगळं विसरून आपण नुसती दुःखाची लय प्रकट करतो. ते एखाद्या नृत्यासारखं असतं.

पुरुष २ : वा ! किती मार्मिक बोलतात ! शोक हेच लयतत्त्वाचं साक्षात रूप असतं ! वा ! वा !

स्त्री २ : (कडक स्वरात ) पुन्हा थांबली ती !

विधवा : ( फुलदाणीपासून बाजूला होऊन स्टेजच्या कडेपर्यंत चालत येते. ) आता मी अगदी एकटी आहे ! अगदी एकटी ! कधी कधी असं बरं वाटतं. ( विराम. ) पण रात्री भीती वाटेल ! दुपारी कंटाळा येईल ! तो होता, तेव्हा कधीच असं वाटायचं नाही ! केवढा आधार होता मला त्याचा ! ( भावविवश स्वरात ) आता मी कशी राहू ? एकटी ! आता मी कशी राहू ?

[ पडद्यातून दोन पुरुष आणि दोन स्त्रियांचा कोरस संथ, लयबद्ध, स्पष्ट आवाजात—]

कोरस : वधू पाहिजे : वर बिजवर. छत्तीस. सुदृढ. दोन मुले. सरकारी नोकरी. मासिक प्राप्ती साडेचारशे रुपये. देशस्थ. जातीची अट नाही. वधू सुस्वरूप, सुदृढ, मनमिळाऊ व गृहकृत्यदक्ष हवी. वय पस्तीसपर्यंत, विधवा चालेल.

इंजिनियर कोकणस्थ ब्राह्मणास वधू पाहिजे : वय तीसपर्यंत. गोरी. निदान पाच फूट तीन इंच उंच. घरकामात तरबेज. गायनात निपुण असल्यास उत्तम. शक्यतो कोकणस्थ पण ब्राह्मण उपजातीतली चालेल. विनापत्य विधवाही चालेल.

सहा फूट उंच, मासिक बाराशे रुपये प्राप्ती असलेल्या गौड सारस्वत ब्राह्मणास वधू पाहिजे : सुसंस्कृत. आकर्षक व्यक्तिमत्त्वाची. जातपातीची अट नाही. वय अठ्ठावीसपर्यंत. फोटोसह अर्ज करावा.

सी. के. पी. वकिलास वधू पाहिजे : वर : बेचाळीस. गोरा, देखणा, हाय-

कोर्टात प्रॅक्टिस, शिवाय शेतीवाडीचे उत्पन्न. घटस्फोटित. घटस्फोटिता किंवा विधवासुद्धा चालेल. मात्र दिसावयाला सुंदर, अव्यंग, आणि सुदृढ हवी. नोकरी असल्यास चांगले. मुलाबाळांची आवड हवी.

नवबौद्ध सरकारी गॅझेटेड अधिकाऱ्याला वधू पाहिजे. शक्यतो गोरी, सुशिक्षित, आणि उदारमतवादी, घरकामांत दक्ष. जातीची अट नाही. विधवा किंवा घटस्फोटिता चालेल. वय तीसच्या वर नसावे.

[ विधवा कानांवर हात ठेवते आणि पलंगावर जाऊन बसते. कोरसचा आवाज थांबतो. ]

विधवा : ( हातांत उशी उचलून उशीशी बोलल्याप्रमाणे ) आता पुन्हा ते शक्य आहे का ? ( विराम. ) आता पुन्हा मी कोणाची वाट पाहू शकेन का ? कोणाबरोबर फिरायला जाऊ शकेन का ?

स्त्री २ : ( अचानक, जरबेच्या सुरात ) चूक ! चूक ! ही शोक करायची रीत नव्हे !

विधवा : ( उशी खाली टाकून देते. ) बरं राह्यलं ! ( इकडेतिकडे बघते. ) भयंकर वैताग आलाय् मला ! भयंकर वैताग ! ( उसासा टाकून पुन्हा खाजगी स्वरात ) शोक . शोक....केलाच पाहिजे ! खरंच शोकात मन रमून जात असेल का ? ( ओरडून ) मला शोक हवाय् , शोक ! शोक कुठं मिळेल मला ? ( उठून उभी राहते. कोपऱ्यात जाऊन केरसुणी उचलून स्टेजवरचा केर लोटू लागते. ) इथं बाकी कसलाच केरकचरा नको ! त्याचीसुद्धा आठवण नको ! निव्वळ शोक हवा ! मनमोकळा शोक ! शुद्ध दुःख !

[ केरसुणी कोपऱ्यात भिरकावते. नंतर तरातरा जाऊन फुलदाणी उचलून फेकते. फुलदाणी फुटल्याचा आवाज. नंतर गादी गुंडाळून ठेवते. पलंग ओढत कोपऱ्यात नेते.
आता स्टेजचा पुढला भाग अगदी रिकामा आहे. प्रकाश त्यावरच केंद्रित झालेला आहे.
पुढे येऊन ती उभी राहते. अंबाडा मोकळा सोडते. त्यातले आकडे एकेक कोपऱ्यात भिरकावून देते. आणि प्रेक्षकांकडे बघत उभी राहते. तडफदार आवाजात. ]

विधवा : तुम्हांला काय वाटलं, मला शोक झालेला नाही ? शोक करायला मी समर्थ

नाही ? (हसते.) शोक तर तुम्हांलाही करता येतो! किती सहज! शोक करण्याची कला आपल्याला सर्वांना जन्मतःच अवगत आहे. (शोकपूर्ण स्वरात) मी आतापर्यंत केला, तो शोकच होता! (हळूच) यापुढेही मी फक्त शोकच करणार आहे. (मोठ्याने) फार काय, ज्यांना नीटसा शोक करता येत नाही, त्यांना मी शोक करायला शिकवणारही आहे. (विराम.) माझा नवरा गेला ? (विराम.) तसंही असेल. (विराम.) तो असतानासुद्धा मी शोकच करत होते. (विराम.) फक्त रीत वेगळी होती! (विराम.) आम्ही एकत्र शोक करत होतो. (विराम.) रात्रंदिवस आम्ही शोक करायला योग्य कारणं शोधत होतो. (विराम.) कारणाचा आधार शोकाला शोभतो. (विराम) मंगळसूत्रासारखा! (विराम.) मला प्रचंड शोक झालाय्, अमर्याद शोक! (विराम.) मीही सभ्य, सुसंस्कृत आहे. (शोकपूर्ण आवाजात) तो मला सोडून गेला! (विराम.) आता त्याचा चेहरासुद्धा मला आठवत नाही. (विराम.) आम्ही एकत्र राहिलो. (विराम) आम्ही पतिपत्नी होतो. (विराम.) पतिपत्नीला साजेसं आयुष्य आम्ही जगलो. (विराम.) आम्ही हनीमूनलासुद्धा गेलो होतो. (विराम.) लग्नात आम्हांला खूप प्रेझेंट्स मिळाली. (विराम.) तेव्हा आईस्क्रीम केलं होतं. (विराम) खर्च अर्धा त्यांनी, अर्धा आम्ही केला होता. (विराम.) तो रोज ऑफिसातून येताना भाजी आणायचा. (विराम.) वांगी, बटाटे, टोमॅटो, पडवळ, दुधी, भोपळा, भेंडी, परवर, तोंडली, गवार, सुरण, फरसबी (विराम.) मधूनमधून आम्ही पिक्चरला जायचो, नाटकांना जायचो! (विराम.) काही काही सिनेमे पाहून रडायला येतं, नाही ? (विराम.) हल्ली फार उकाडा होतो. (विराम.) सरबत करून प्यायले असते; पण साखरेचा भाव परत वाढलाय्. (विराम. दचकते.) हे काय ? माझा शोक कुठं गेला ? (पुन्हा स्टेजवर इकडेतिकडे बघत हिंडते. मग परत पुढे येऊन उभी राहते.) शोकाचं असंच असतं. (दुःखी आवाज काढून) दुःख नेहमी आपल्याशी लपंडाव खेळतं! जेव्हा ते लपतं, तेव्हा ते लपल्याचं दुःख होऊन ते परत आपल्याला सापडतं. जेव्हा ते सापडतं, तेव्हा ते हरवेल, अशी भीती वाटून आपण पुन्हा दुःख करतो! (विराम.) मी रडेन, असं तुम्हांला वाटतं का ? (विराम.) मला व्याकरणात पैकीच्या पैकी मार्क मिळायचे. (विराम.) कदाचित मी रडेनसुद्धा! पण मी का म्हणून रडू ? (विराम.) मला बोलता येतंय् की! मी अगदी नॉर्मल आहे! मला शोक-सुद्धा करता येतो. (विराम.) काहीतरी हरवलंय्! (विराम.) माझा नवरा हरवलाय्. (विराम.) बरं झालं, तो हरवला. (विराम.) नाहीतर मला तो

हवासा वाटला नसता. ( विराम. ) कोणालाच काहीच थांबवता येत नाही. ( विराम. ) पण शोकात तल्लीन होता येतं अगदी ! ( विराम. ) आणि एकदा शोक करायला सुरुवात केली, की कितीतरी लोक आपणहून त्यात सहभागी व्हायला येतात ! ( विराम. ) पदरमोड करूनसुद्धा दुःख करायला लोक तयार होतात. ( विराम. ) मला आवाज सापडत नव्हता. आता मी शोक करू शकते. दाखवू करून ? ( विराम. ) माझा आत्मविश्वास मला परत मिळालाय् ! खरंच ! ( विराम. ती पुन्हा स्टेजवर इकडेतिकडे फिरून पुढे येते. अस्खलित, नाट्यपूर्ण स्वरात ) प्रथम माझं हृदय शोकमय होतं. ते फोडून माझा शोक बाहेर आला. ही खोली शोकानं भरून गेली. पण शोक वाढतच राहिला. महापुरासारखा. उंच, प्रचंड. आकाशाला जाऊन भिडला. पृथ्वीत खोल गेला. आता मीच शोक आहे. मी जाईन, तिथं शोक आहे. मला दिसेल, ते ते शोक आहे. सर्व वस्तूंत, सर्व माणसांत आता मला शोक दिसतो.

[ कोचावरची मंडळी टाळ्यांचा कडकडाट करतात. ती त्यांच्याकडे मान लववते. ]

विधवा : सर्वेऽत्र दुःखिनः सन्तु ! ( विराम. ) आपण सर्वांनी मिळून खूप खूप दुःख केलं पाहिजे ! लहान मुलं, तरुण–तरुणी, वृद्ध, पापी, पुण्यवान, गरीब, श्रीमंत—सर्वांनी भेदभाव विसरून एकत्र येऊन दुःख केलं पाहिजे ! दुःख कसलं ? म्हातारी मेल्याचं दुःख नाही; पण काळ सोकावतो, याचं ! दुःखामुळं एक अगाध, विपरीत आनंद होतो. हा आनंद कोणीच आपल्यापासून हिरावून घेऊ शकत नाही. ( विराम. ) स्वतःलाच स्वतः कुरवाळल्यासारखा हा स्वायत्त आनंद आहे. ( विराम. ) एकत्र दुःख करत राहिलो, तर आपण एकमेकांना कुरवाळत राहू. ( विराम. ) मग मृत्यूचेही आपण आभारच मानू. ( विराम. ) फार काय, एकमेकांच्या मरणाचे उत्सव आपण साजरे करत राहू ! ( विराम ) शोकाच्या आड काहीच येऊ शकत नाही. ( विराम. ) कारण, शोक ही वस्तू नाही. ( विराम. ) शोक ही जाणीव आहे, चैतन्य आहे ! ( तिचा आवाज एकदम घोगरा. रूक्ष, कठोर, स्त्री क्रमांक २ सारखा येतो. ) शोक ही एकमेव सर्जनशील गोष्ट आहे. प्रथम तुम्हांला जमणार नाही. एकदा जमला, की तुम्हांला अमरत्व लाभेल.

[ कोचावरून टाळ्यांचा कडकडाट.

पुरुष क्रमांक २ पुष्पगुच्छ घेऊन पुढे येतो आणि लवून तो विधवेला सादर करतो.
तीही लवून त्याचा स्वीकार करते.
कोचावरून पुन्हा टाळ्यांचा कडकडाट.
पुरुष क्रमांक १ च्या कॅमेऱ्याच्या फ्लॅशबल्बचा प्रकाश अन् आवाज. मग पुरुष क्रमांक २ परततो.
शांतता. दोन मिनिटे संपूर्ण शांतता.
विधवा किंचित लवून प्रेक्षकांपुढे मान तुकवून, हातांत गुच्छ धरून निश्चल उभी आहे. एवढ्यात ती मान वर करते. प्रेक्षकांकडे नजर टाकून म्हणते–]

विधवा : खरं तर याचं श्रेय सगळं तुम्हांलाच जातं!

[ती प्रेक्षकांच्या दिशेने पुष्पगुच्छ भिरकावून देते.
स्टेजवरले सर्व दिवे मालवले जातात आणि.... ]

प ड दा

म. ग्रं. ... ग्रंथालय ...
क्र. 23380 ता. दि. 95.1.89
वि. ........ 2७

IRBK-0123349